म. ग्रं. सं. ठाणे

विषय

संग्रहालय क्रमांक

लेखक २।·७।·

पुस्तकाचें नांव ५।७२

सन

म. ग्रं. सं. ठाणें
. नं.



किंमत ४ आणे

N 11 this book belongs to
Balkrishna Pandurang
Naik

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं०
THANA
राठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ग्र.

# सिंहासनबत्तिशी.

श्रीमंत प्रौढप्रताप शौर्यौदार्याद्यनेकगुणविराजमान श्रीभोजराजा धारानगराचेठायीं राज्य करीत असतां, कोणएकेसमयीं अवंती नगराजवळ एका ब्राह्मणानें नवी भूमी साधून शेत पेरिलें होतें, तें आलें ते समयीं त्याच्या संरक्षणाकरितां शेतामध्यें माळा करून तो ब्राह्मण त्याजवर नित्य बसत असे; त्याणें जे समयीं वरतें बसावें, ते समयीं त्याची बुद्धि मोठी उदार व्हावी, आणि खालीं असतां पुनः पूर्ववत् व्हावी. हा चमत्कार अनुभवून त्या ब्राह्मणानें जाऊन भोजराजास सांगितलें, तेव्हां मोठे आश्चर्य मानून राजा त्या ब्राह्मणाबरोबर शेतांत येऊन माळ्यावर चढला, त्या वेळेस त्यास असें वाटलें कीं, सर्व जनाचें दारिद्र्य दूर करावें, नंतर खालीं येऊन पहातो तों ती बुद्धि नाहीं; हा प्रत्यक्ष बुद्धिभेदाचा अनुभव घेऊन राजानें मनांत विचार केला कीं, हा भूमीचा गुण किंवा येथें कांहीं वस्तु आहे तिचा गुण हें पहावें, नंतर त्या ब्राह्मणास बहुत द्रव्य देऊन राजानें तें शेत घेतलें आणि तेथें खणिलें, तों रत्नखचित चंद्रकांत मण्याचें सिं-

हासन, ज्यास बत्तीस रत्नपुतळ्या जडल्या आहेत असें पाहिलें, तें मोठे प्रयासानें बाहेर काढून आपले नगरांत आणिलें, आणि राजमंडपांत ठेविलें. मग अनेक तीर्थोदकें, अष्टोत्तरशत औषधी, छत्र, चामर, खड्ग इत्यादिक राज्याभिषेक सामग्री सिद्ध करवून सुमुहूर्तीं श्रीभोजराजा त्या सिंहासनावर बसूं लागला; तेव्हां त्याजवरील 'जया' नामें रत्नपुतळी मनुष्यवाणीनें बोलूं लागली. हे भोजराजा! ज्याचें औदार्य फार असेल त्याणें या सिंहासनावर बसावें, इतरांस अधिकार नाहीं; असें तिचें वाक्य ऐकून भोजराजा बहुत विस्मित होऊन तिला पुसूं लागला कीं, मी याचकांस लाखो रुपये सहज देतों, मजहून दुसरा उदार कोण आहे? तें ऐकून त्या पुतळीनें उत्तर केलें कीं, जो आपल्या मुखानें आपली स्तुति करितो तो लघुता पावतो. या विषयीं वचन.—

परैः प्रोक्ता गुणा यस्य निर्गुणोऽपि गुणी भवेत् ॥
इंद्रोऽपि लघुतां याति स्वयं प्रख्यापितैर्गुणैः ॥ १ ॥

याचा अर्थ. दुसऱ्यांनीं ज्याच्या गुणांची स्तुति केली तो पुरुष अल्पगुणी जरी असला तरी थोरवी पावतो; आणि इंद्रही जर आपला थोरपणा आपले तोंडानें वर्णित आहे,

तर तो लघुता पावतो. तें ऐकून भोजराजा लज्जायमान जहाला; परंतु ही रत्नाची पुतळी मनुष्यासारखी बोलत्ये हें आश्चर्य मानून तिला पुसतो. हें कोणाचें सिंहासन व याजवर बसणाराचें औदार्य कसें होतें तें सांग. याप्रमाणें राजाचें बोलणें ऐकून 'जयापुतळी' कथा सांगूं लागली.

उज्जयिनी नगरींत भर्तृहरी राज्य करीत असतां कोणी एक ब्राह्मण देवीजवळ तप करीत होता, त्यास देवी प्रसन्न होऊन वर माग ह्मणाली तेव्हां त्या ब्राह्मणानें अमरत्व मागितलें असतां भवानी त्यास एक फळ देऊन बोलली कीं, हें फळ जो खाईल तो अमर होईल. नंतर तें फळ घेऊन ब्राह्मण घरास आला आणि विचार करूं लागला कीं, मी दरीद्री, अमर झालों तर फार दिवस भिक्षा मागावी लागेल, यास्तव हें फळ राजास द्यावें ह्मणजे तो बहुत दिवस पृथ्वीचें पालन करील. असा निश्चय करून ब्राह्मणानें अति आदरानें तें फळ भर्तृहरीस दिलें, आणि आपलें वर्तमान सांगितलें. तें ऐकून राजानें बहुत द्रव्य ब्राह्मणास देऊन तें फळ आवडीनें आपल्या स्त्रीस दिलें, तिणें आपले जारास दिलें, जारानें आपले वेश्येस दिलें, ती वेश्या राजानें राखिली होती तिणें तें राजास नेऊन दिलें, त्याणें तें फळ पाहून चौकशी केली

तेव्हां सर्व वर्तमान कळलें मग पश्चात्ताप पावून बोलला.—

यां चिंतयामि सततं मयि सा विरक्ता
सा चान्यमिच्छति जनं सजनोऽन्यसक्तः ॥
अस्मत्कृते तु परितुष्यति काचिदन्या
धिक्तां च तं च मदनं च इमां च मां च ॥१॥

याचा अर्थ.—मी जीचें नित्य चिंतन करितों ती मला सोडून दुसऱ्यावर प्रीति करिते, तोही दुसऱ्या स्त्रीची इच्छा करितो, ती स्त्री माझेठायीं प्रीति करित्ये, तस्मात् त्या स्त्रीला, त्या पुरुषाला, अशी प्रीति उत्पन्न करणाऱ्या मदनाला, ह्या स्त्रीला आणि मलाही धिक्कार असो. याप्रमाणें सर्वांची निंदा करून तें फळ त्याणें आपणच भक्षिलें आणि त्या तिटकाऱ्यानें राज्य सोडून वनवासास गेला. मग त्याचे ठिकाणीं प्रधानांनीं जो राजा बसवावा तो वेताळानें मारावा; याप्रमाणें बहुत राजे मारिले. हें वर्तमान भर्तृहरीचा धाकटा बंधु विक्रम देशांतरीं गेला होता त्यास कळलें; तेसमयीं तो सामान्य पुरुषाचा वेष धरून उज्जयिनीस आला आणि प्रधानास विचारूं लागला कीं, येथें कोणी राजा नाहीं याचें कारण काय? तेव्हां त्यांणीं वेताळाचें वर्तमान सांगितलें,

तें ऐकून विक्रम ह्मणतो:-मला राज्यपदीं बसवाल तर मी हें राज्य चालवीन; तेव्हां प्रधानांनीं विचार केला कीं, हा कोणी मोठा धैर्यवान् आहे ह्मणून असें भाषण करितो तर यास राज्याभिषेक करावा; असा निश्चय करून त्यांहीं त्यास राज्यपदीं स्थापिलें. मग त्याणें सायंकाळपर्यंत राज्यकारभार करून रात्रीं नानाप्रकारचें अन्न सिद्ध करवून आपल्या पलंगाजवळ ठेविलें आणि आपण तरवार घेऊन जागत बसला. इतक्यांत तेथें वेताळ आला, त्यास राजा बोलतो हे वेताळा! हें बहुत प्रकारचें अन्न तुजसाठीं ठेविलें आहे तें आधीं खाऊन मग मला खा. तें ऐकून वेताळानें सर्व अन्न भक्षिलें आणि तितक्यांतच तृप्त होऊन आपल्या ठिकाणीं गेला. त्या दिवसापासून वेताळ नित्यनेमानें अन्न खाऊन जात असे, एके दिवशीं विक्रमानें त्यास पुसिलें कीं, तुझी शक्ति आणि ज्ञान किती आहे तें सांग; तेव्हां वेताळ ह्मणाला मी जें इच्छीन तें करीन, आणि मला भूत भविष्य वर्तमान कळतें; तें ऐकून विक्रम ह्मणतो कीं, माझे आयुष्यांत पांच वर्षें उणीं अथवा अधिक कर बरें! वेताळानें उत्तर केलें कीं, हें कोणाचे स्वाधीन नाहीं, असें बोलून तो आपल्या ठिकाणीं गेला. दुसरे दिवशीं विक्रमाने अन्न ठेविलें नाहीं, तेव्हां वेताळ रागें

भरून बोलला कीं, अरे आज कां अन्न नाहीं ठेविलेंस? विक्रम बोलिला कीं, तुझ्यानें माझें आयुष्य उणें किंवा अधिक करवत नाहीं, मग तुला नित्य बळी उगाच कशासाठीं द्यावा; तुझी इच्छा असेल तर युद्धास सिद्ध हो. याप्रमाणें भाषण करून विक्रम हातांत तरवार घेऊन लढाईस उभा राहिला, हें पाहून वेताळ ह्मणतो विक्रमा! तुझ्या धैर्यानें मी संतुष्ट झालों, यास्तव तूं कांहीं वर माग. विक्रम बोलिला ज्या वेळेस तुझें स्मरण करीन त्या वेळेस येऊन माझें कार्य करावें, तें मान्य करून वेताळ गेला; मग मोठ्या समारंभानें विक्रमानें आपणास राज्याभिषेक करविला, आणि राज्य करूं लागला. तो एके दिवशीं सिद्धसेन नामा कवि उज्जयिनीस येऊन राजास आपण आलों असें कळविता झाला. तेव्हां विक्रमानें भेटीच्या अगोदरच त्यास चवदा लक्ष रुपये आणि नऊ गांवांचें दानपत्र पाठवून सेवकांस सांगितलें कीं, आणखीं कांहीं कवीची इच्छा असेल तर त्यास सभेस घेऊन या, याप्रमाणें राजाज्ञा ऐकून दूतांनीं रुपये व ग्रामपत्र कवीस दिलें असतांहि कवि सभेस गेला, तों राजा पूर्वेस मुख करून बसला होता ते समयीं कवीनें हा श्लोक ह्मटला.—

अपूर्वेयं धनुर्विद्या भवता शिक्षिता कुतः ॥

मार्गणौघः समभ्येति गुणो याति दिगंतरं ॥१॥

याचा अर्थ.—हे विक्रमा! ही अपूर्व धनुर्विद्या तूं कोणाजवळ शिकलास, ज्या विद्येनें बाण तुजकडे येतात आणि धनुष्याची दोरी बाहेर जात्ये. याप्रमाणें श्लोकाचा अर्थ दिसण्यांत येतो, परंतु वास्तविक अर्थ असा होतो कीं तूं मागणारास बहुत द्रव्य देतोस, ही कीर्ति दिगंतीं जात्ये ह्मणून याचक तुजकडे येतात. असा अर्थ समजून पूर्वदिशेचें राज्य यास द्यावें असें मनांत आणून विक्रम दक्षिणेकडे फिरून बसला. मग कवीनें दुसरा श्लोक ह्मटला—

सर्वदा सर्वदोऽसीति मिथ्यात्वं कथ्यसे बुधैः ॥
नारयो लेभिरे पृष्ठं न वक्षः परयोषितः ॥२॥

याचा अर्थ.—हे राजा! तूं सर्वदा सर्व देतोस अशी लटकीच तुझी स्तुति लोक करितात, ती लटकी कशी ती ऐक; तूं शत्रूंस पाठ आणि परस्त्रियांस हृदय हीं कधींहि दिलीं नाहींस. हा श्लोक ऐकून त्या कवीस दक्षिण दिशेचें राज्य द्यावें असें मनांत आणून विक्रम पश्चिमेस बसला; नंतर त्यानें तिसरा श्लोक ह्मटला.

अरयस्ते भयत्रस्ताः स्फुटिता घटवद्धृदि ॥

**गलितंनेत्रपाताच्चराजनचित्रमिदंमहत् ॥ ३ ॥**

याचा अर्थ—हे विक्रमा! तुझ्या भयानें तुझे शत्रु त्रास पावून त्यांचे हृदयघट फुटले, त्यांतून उदक गळावें तें नेत्रांतून गळूं लागलें, हा मोटा चमत्कार आहे. तें ऐकून राजा उत्तरेस तोंड करून बसला, तों कवीनें चवथा श्लोक ह्मटला.—

**सरस्वती स्थिता कंठे लक्ष्मीः करसरोरुहे ॥**
**राजेंद्र कुपिताकीर्तिस्तेनदेशांतरंगता ॥ ४ ॥**

याचा अर्थ.—हे विक्रमा! तुझ्या कंठाचे ठायीं सरस्वती आणि हस्ताचे ठायीं लक्ष्मी राहिली ह्मणून रागानें कीर्ती देशांतरीं गेली, असें श्रवण करून विक्रमानें कवीस नमस्कार करून सांगितलें कीं तुला चारही दिशांचें राज्य दिलें; तेंव्हां कवीनें उतर केलें कीं, मी राज्य घेऊन काय करूं? तें तुलाच अक्षय असो. तुझ्या दातृत्वानें मी फार संतुष्ट झालों. नंतर राजास आशीर्वाद देऊन कवि आपल्या ठिकाणास जाता झाला. याप्रमाणें विक्रम दाता, परोपकारी, शूर, असा लौकिक स्वर्गीं कळून इंद्रानें त्यास सिंहासन पाठवून दिलें. मग त्याजवर बसून बहुत दिवस राज्य करून शेवटीं, तो स्वीस-

हित स्वर्गवासी झाला. ते समयीं आकाशवाणी झाली कीं, ह्या सिंहासनावर बसावयास आतां कोणी योग्य नाहीं, यास्तव हें भूमींत पुरून ठेवा. मग प्रधानांनीं तसें केलें, तें हें सिंहासन आज तुला सहज सांपडलें आणि तूं याजवर बसावयास सिद्ध झाला आहेस. परंतु विक्रमाची योग्यता तुझे आंगीं नाहीं ह्मणून तूं याजवर बसूं नयेस. याप्रमाणें 'जया' पुतळीचें बोलणें ऐकून भोजराजा खिन्न होऊन आपल्या महालांत गेला. आणि मनांत विचार करितो आहे कीं, ही एक पुतळी बोलली या वरून दुसऱ्याही बोलतील असें वाटतें. तर आपण कौतुकानें नित्य सिंहासनावर बसावयास जात असावें असें मनांत आणून पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला,तेव्हां'विजया'नामें दुसरी पुतळी बोलूं लागली. हे भोजराजा, विक्रमासारिखें औदार्य तुझें असेल तर या सिंहासनावर बैस. तें ऐकून भोजराजा विचारितो, त्याचें औदार्य कसें होतें तें सांग. मग 'विजयापुतळी' सांगत्ये.—

## कथा २ री.

कोणे एके समयीं विक्रम राजा सभेस बसला असतां एक दरिद्री ब्राह्मण येऊन उगाच उभा राहिला, तेव्हां प्रधानांनीं

विनंती केली कीं, ह्मा बहुत दरिद्री आहे ह्मणून आपल्या जवळ आला आहे. तें ऐकून राजानें त्यास लक्ष रुपये दिले तेव्हां ब्राह्मण संतुष्ट होऊन त्याणें श्लोक ह्मटला.—

संग्रहेण कुलीनानां राज्यं कुर्वंति पार्थिवाः ॥
आदिमध्यावसानेषु न त्यजंति च ते नृपम् ॥

याचा अर्थ.—हे राजा! कुलीन पुरुषांचा संग्रह करून राजे राज्य करितात, ह्मणून ते पुरुष राजास कधींही सोडीत नाहींत; याविषयीं एक कथा सांगतों ऐक.

विशाल नगरींत नंदराजा होता तो भानूमती स्त्रीच्या स्वरूपास मोहित होऊन राज्यकारभार सोडिता झाला, तेव्हां त्यास बहुश्रुत प्रधानानें विनंती केली कीं, हे राजा! गुरु वैद्य, आणि प्रधान यांणीं केवळ मर्जीसारिखें बोलूं नये. जें खरें असेल तें सांगावें अशी नीती आहे, ह्मणून बोलतों ऐक.—आपण सभेस यावयाचें सोडिलें हें समजून शत्रु राज्यांत बहुत उपद्रव करूं लागले असें प्रधानाचें भाषण ऐकून नंदराजा ह्मणतो तूं खरें सांगतोस. परंतु भानुमतीस सोडून मला क्षणभरही राहावत नाहीं. यास कांहीं उपाय करशील तर मी दरबारीं येईन. असें राजाचें बोलणें ऐकून बहुश्रुत

प्रधानानें चितान्याकरवीं भानुमतीचें चित्र काढून राजास दाखवीलें, तें राजानें शारदानंद गुरूचे हातीं दिलें तें पाहून त्याणें सांगितलें हें चित्र भानुमती सारिखेंच आहे. परंतु तिच्या मांडीवर चिन्ह आहे तें येथें नाहीं. असें त्याचें वाक्य ऐकून नंदराजास फार राग येऊन प्रधानास आज्ञा केली कीं, शारदानंदास अरण्यांत नेऊन मारून टाक. ती आज्ञा मान्य करून प्रधानानें त्यास आपल्या घरीं नेलें आणि विचार केला कीं, भानुमतीचे मांडीवरील चिन्ह यानें अंतरज्ञानानें सांगितलें, तें नजाणून राजाचे मनांत दुष्टबुद्धि आली आणि ह्यास मारावयास आज्ञा केली; परंतु मारला असतां प्रभूस पातक लागेल यास्तव लपवून ठेवावा असा निश्चय करून शारदानंदास राजाज्ञा सांगून तळघरांत लपवून ठेविला आणि मारिला असें लटकेंच राजास सांगितलें; नंतर एके दिवशीं राजपुत्र विजयपाळ अरण्यांत शिकारीस गेला, तेथें मोठा डुक्कर पाहून त्याचे पाठिमागें एकलाच लागला असतां डुकर पर्वताचे गुहेंत शिरला; मग राजपुत्र बहुत श्रमून पाणी पिण्याकरितां घोड्याखालीं उतरला. इतक्यांत एक वाघ येत होता त्यास पाहून भयानें झाडावर चढला. त्याच झाडावर एक आस्वल वाघाच्या भयास्तव पूर्वींच बसला

होता; त्याची ह्याची एक दृष्टी होतांच राजपुत्र घाबरा झाला. तेव्हां आस्वल ह्मणाला तूं भिऊं नको, मी तुझा घात करणार नाहीं; तें ऐकून तो विश्वासानें त्याजवळ बसला आणि वाघही त्या दोघांस पाहून वृक्षाखालीं उभा राहिला. मग रात्रीचेसमयीं विजयपाळास झोंप येऊं लागली; तेव्हां आस्वल बोलिला तूं कांहीं संशय न धरितां माझे मांडीवर नीज. तें ऐकून त्याच्या मांडीवर डोकें ठेवून राजपुत्र निजला, तेव्हां वाघ आस्वलास ह्मणाला, तूं आणि मी नित्य अरण्यांत राहणारे आणि हा मनुष्य आपला शत्रु यास्तव यास खालीं लोटून दे ह्मणजे दोघांचेंही कार्य होईल आस्वलानें उत्तर केलें कीं तूं कितीहि सांगितलेंस तरी मी विश्वासघात करणार नाहीं, तेव्हां वाघ उगाच बसला. मग मध्यरात्र झाल्यावर विजयपाळ उठला, त्याची मांडी उशास घेऊन आस्वल निजला. ते समयीं वाघ राजपुत्रास ह्मणतो तूं या आश्वलाचा विश्वास धरूं नको कां कीं, राजनीतींत सांगितलें आहे श्लोक.—

नदीनां च नखीनां च शृंगिणां शस्त्रपाणिनां ॥
विश्वासोनैवकर्तव्यः स्त्रीषुराजकुलेष्वपि ॥ १

याचा अर्थ.—नदी, तिखटनखांचीं जनावरें, तसेंच शिंगांचे

पशु, हातियारी, स्त्रिया आणि राजे यांचा विश्वास धरूं नये अशी नीती आहे; ह्मणून तुला सांगतों कीं तूं या आस्वलास खालीं ढकलून दे, ह्मणजे मी त्यास खाऊन तुला वाट देईन, तें ऐकून राजपुत्रानें त्यास खालीं लोटिलें, तेव्हां तो पडतां पडतां सावध होऊन एका खांदीस धरून पुन्हां आपल्या ठिकाणीं आला, तें पाहून राजपुत्रभ यानें थरथरां कांपूं लागला त्यास आस्वल ह्मणतो माझें भय मानूं नको, मी तुझ्या शरीरास उपद्रव करणार नाहीं परंतु माझ्या शापानें तुला 'ससेमिरा' या अक्षरांचें वेड लागेल जेव्हां हीं अक्षरें आधीं आहेत ज्यांस, असे चार श्लोक माझ्या मनांत आहेत ते तुला ऐकविणारा कोणी भेटेल; तेव्हां तुझें वेड जाईल मग सूर्योदय होतांच वाघ आणि आस्वल आपापले ठिकाणीं गेले. विजयपाळ विश्वासघाताच्या पातकामुळें 'ससेमिरा' हीं अक्षरें ह्मणत वेडा होऊन रानांत फिरूं लागला त्याचा घोडा नगरांत एकलाच आला; तो पाहून नंदराजा चिंतायुक्त होऊन पुत्राच्या शोधार्थ सैन्य घेऊन वनांत गेला. तों विजयपाळ ससेमिरा ह्मणत फिरत आहे असा पाहिला. त्यास घरीं आणून बहुत उपाय केले; परंतु त्याचें वेड जाईना, तेव्हां नंदराजा बहुश्रुत प्रधानास ह्मणतो कीं, जर आज शा-

रदानंद असता तर यास बरें करिता. प्रधान बोलिला कीं, आपल्या शहरांत दौंडी पिटवून लोकांस कळवावें ह्मणजे कोणी तरी यास बरें करणारा भेटेल. तें ऐकून नंदराजानें तसें करावयास आज्ञा केली. नंतर बहुश्रुत प्रधान आपल्या घरीं येऊन शारदानंदास तें वर्तमान सांगता झाला. तेव्हां तो ह्मणाला तूं राजाजवळ जाऊन सांग कीं, माझी कन्या बहुत चतुर आहे ती कांहीं उपाय करील. तें ऐकून प्रधानानें तसेंच राजास सांगून पुत्रासहित त्यास आपल्या घरास आणिलें. नंतर कन्या पडद्यांत बसवितों असें बोलून शारदानंदास पडद्याचे आंत बसवून बाहेर राजास पुत्रादिकांसहवर्तमान बसविलें. ते समयीं शारदानंद अंतर्ज्ञानानें अरण्यांतील सर्व वर्तमान जाणून हे चार श्लोक पढता झाला.

सद्भावप्रतिपन्नानांवचनेकाविदग्धता ॥
अंकमारुह्यसुप्तानांहंतुःकिंनामपौरुषं ॥ १ ॥

याचा अर्थ—ज्याणें आपल्यावर विश्वास ठेविला त्यास टकाविलें तर त्यांस काय चातुर्य ! मांडीवर निजला त्याचा जीव घेतला तर त्यांत काय पराक्रम केला! हा श्लोक ऐकतां-

च राजपुत्रानें एक अक्षर सोडून दिलें आणि 'सेमिरा' हें बोलूं लागला तों शारदानंदानें दुसरा श्लोक ह्मटला.—

सेतुंगत्वासमुद्रस्यगंगासागरसंगमम् ॥
ब्रह्मघ्नोपिविमुच्येतमित्रद्रोहीनमुच्यते ॥ २ ॥

याचा अर्थ—गंगेचा समुद्राशीं जेथें संगम झाला त्या ठिकाणीं, अथवा सेतुबंधरामेश्वरीं गेले असतां ब्रह्महत्याही करणारा मुक्त होतो; परंतु मित्रदोही त्या पापापासून कोठेंच मुक्त होत नाहीं. हें ऐकतांच विजयपाळ दुसरें अक्षर सोडून 'मिरा' हें ह्मणूं लागला, तेव्हां शारदानंदानें तिसरा श्लोक ह्मटला.

मित्रदोहीकृतघ्नश्चतथाविश्वासघातकः ॥
त्रयस्तेनरकंयांतियावच्चंद्रदिवाकरौ ॥ ३ ॥

याचा अर्थ—मित्राचा घात करणारा, उपकारन जाणणारा, व विश्वास देऊन घात करणारा हे तिघे जोंपर्यंत सूर्य चंद्र आहेत तोंपर्यंत नरकीं राहतात. हा श्लोक ऐकून राजपुत्रानें तिसरें अक्षर टाकिलें आणि 'रा' ह्मणूं लागला, तेव्हां शारदानंदानें चवथा श्लोक ह्मटला.

सिद्धांतःसर्वशास्त्राणामयंनकलुषंपरम् ॥
विश्वासघातात्पुण्यंचनपरोपकृतेःपरम् ॥ ४ ॥

याचा अर्थ—सर्व शास्त्रांचा सिद्धांत असा आहे कीं, विश्वासघाताहून दुसरें थोर पातक नाहीं. आणि परोपकाराहून दुसरें मोठें पुण्य नाहीं, हा श्लोक ऐकून राजपुत्राचें वेड गेलें आणि तो रानांतील झालेलें वर्तमान राजास सांगता झाला; ते वेळीं राजा पडद्यांतील कन्येस पुसतो. हे मुली! तूं गांवांत राहतेस अरण्यांत कधींहि जात नाहींस; असें असतां तेथील वर्तमान तुला कसें कळलें तें सांग? तेव्हां शारदानंद बोलला देवब्राह्मणांच्या प्रसादेंकरून माझ्या जिव्हाग्रीं सरस्वती आहे; तिच्या योगानें मी सर्व जाणतों; जसें भानुमतीचे मांडीवरचें चिन्ह जाणिलें. तें ऐकतांच नंदराजाची खूण पटली आणि पडदा वर करून पाहिलें तों शारदानंद बसला आहे त्यास राजानें आणि विजयपाळानें साष्टांग नमस्कार घालून आपले घरीं नेलें. अशी कथा ब्राह्मणानें विक्रमास सांगितली, तेव्हां त्यानें त्या ब्राह्मणास कोटी रुपये दिले. याप्रमाणें तुझें औदार्य असेल तर या सिंहासनावर बैस. असें 'विजया' पुतळीचें भाषण ऐकून भोजराजा खिन्न होऊन

आपल्या महालांत गेला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां तिसरी पुतळी 'जयंती' बोलली; हे भोजराजा! विक्रमासारिखें तुझें धैर्य असेल तर या सिंहासनावर बैस. तेव्हां भोजराजानें विचारिलें त्याचें धैर्य कसें होतें तें सांग. मग 'जयंती' सांगत्ये.—

## कथा ३ री.

विक्रमराजा राज्य करीत असतां पृथ्वीवर कोठें काय चमत्कार आहे तो आपणास कळावा ह्मणून दूत चहूंकडे पाठवित असे. एकेदिवशीं दूतानें येऊन सांगितलें कीं, चित्रकूट पर्वतावर देवीचें देऊळ आहे, त्याच्यापुढें नदी आहे तींत जो पुण्यवान् आहे त्यानें स्नान केलें असतां तिचें पाणी स्वच्छ होतें; आणि पापी मनुष्यानें केलें तर सर्व पाणी गढूळ होतें, हा मोठा चमत्कार आहे. दुसरें त्या देवीजवळ एक ब्राह्मण बहुत दिवस तपश्चर्या करीत आहे, परंतु त्यास भवानी प्रसन्न होत नाहीं. असें ऐकून त्या पर्वतावर जाऊन विक्रमानें नदींत स्नान केलें, तों उदक स्वच्छ झालें; त्यावरून आपण पवित्र आहों असें समजून त्यानें देवीस साष्टांग नमस्कार केला. नंतर ब्राह्मणाजवळ जाऊन त्यास विचारिलें कीं, तूं येथें कि-

ती दिवस अनुष्ठान करीत आहेस? त्यानें उत्तर केलें कीं, तीन तपें; परंतु अजून देवीस माझी करुणा येत नाहीं. असें ऐकून विक्रम राजा देवीची स्तुति करूं लागला; तथापि ती प्रसन्न होईना. त्यावेळीं राजानें विचार केला कीं, हें शरीर कधीं तरी व्यर्थ जाणार त्यापेक्षां ब्राह्मणाच्या कार्याकरितां आज देवीस अर्पण करावें हें वरें; असा निश्चय करून हातांत तलवार घेऊन आपलें शिर तोडूं लागला. तें राजाचें धैर्य पाहून देवी प्रत्यक्ष येऊन त्याचा हात धरून बोलली कीं, तुला जें पाहिजे तें माग. राजा बोलला कीं, मला तूं एका घटिकेंत प्रसन्न झालीस, आणि हा ब्राह्मण बहुत दिवस तप करितो त्यास कां वर देत नाहींस तें सांग. भवानी ह्मणते अरे! याचा भाव शुद्ध नाहीं, ह्मणून मी यावर कृपा करीत नाहीं. ह्मटलें आहे.

नकाष्ठेविद्यतेदेवोनपाषाणेनमृन्मये ॥
भावेहिविद्यतेदेवस्तस्माद्भावोहिकारणं ॥ १ ॥

याचा अर्थ—काष्ठ, पाषाण, व मृत्तिका यांचे ठायीं देव रहात नाहीं, तर भावाचे ठायीं राहतो; ह्मणून माझी कृपा व्हावयास भावच कारण आहे. असें ऐकून विक्रम ह्मणाला

हे भवानि! तूं जर मला प्रसन्न झाली आहेस तर ह्या ब्राह्मणाचें कार्य कर, हें मागतों. तें मान्य करून देवी ब्राह्मणांची इच्छा परिपूर्ण करिती झाली. नंतर विक्रमराजा अवंतीनगरास येता झाला. ही कथा सांगून 'जयंती' बोलली असें तुझें धैर्य असलें तर या सिंहासनावर बैस, तें ऐकून भोजराजा फार खंती होऊन माघारा फिरला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनावर बसूं लागला. तेव्हां 'अपराजिता' चवथी पुतळी बोलली हे भोजराजा! विक्रमासारिखें तुझें औदार्य असेल तर या सिंहासनाचे पायरीवर पाय दे. तेव्हां त्याणें विचारिलें त्याचें उदारत्व कसें होतें तें तूं सांग. मग 'अपराजिता' सांगत्ये.—

## कथा ४ थी.

अवंतीनगरींत विक्रमराजा राज्य करीत असतां त्याचा पराक्रम पाहून स्वर्गलोकीं इंद्रादिक देवही त्यास भीत होते. ह्मटलें आहे—

उद्यमःसाहसंधैर्यंबलंबुद्धिःपराक्रमः ॥
षडेतेयत्रतिष्ठंतितत्रदेवोऽपिशंकते ॥ १ ॥

याचा अर्थ—उद्योग, अचाटकर्म, धैर्य, बळ, बुद्धि आ-

णि पराक्रम हे सहा गुण ज्याचे विशेष आहेत त्यास देवही भितात. असा सर्वगुणयुक्त विक्रम होता. एके दिवशीं त्यानें विचार केला कीं, लक्ष्मी अति चंचल आहे, इचा भरंवसा नाहीं तर सत्कर्मानें इचा व्यय करून पुण्य जोडावें. असा निश्चय करून यज्ञास आरंभ करिता झाला. नंतर सर्व यज्ञसामग्री सिद्ध करवून सर्वांस बोलावणीं पाठविलीं आणि एका ब्राह्मणास सांगितलें कीं, तूं जाऊन समुद्रास आमंत्रण कर. तेव्हां तो ब्राह्मण गंधाक्षता घेऊन समुद्राजवळ येऊन उभा राहिला, आणि ह्मणतो—हे सागरा! तुला विक्रम राजानें यज्ञाच्या समारंभास बोलाविलें आहे. कृपा करून आलें पाहिजे. तें ऐकून समुद्र प्रत्यक्ष होऊन बोलतो. हे ब्राह्मणा! विक्रमानें प्रीतीकरून आमंत्रण पाठविलें, तेणेंकरून मला बहुत संतोष झाला; परंतु ईश्वरानें मला आज्ञा केली आहे कीं, तूं आपली मर्यादा सोडून जाऊं नको, ह्मणून मला येतां कामा नये; तर मी त्यास हीं चार रत्नें देतों तीं नेऊन दे. यांचे गुण सांगतों ते ऐक. ह्या पहिल्या रत्नाची पुजा करून प्रार्थना केली असतां जितकें द्रव्य पाहिजे तितकें उत्पन्न होईल; दुसऱ्यापासून जें अन्न पाहिजे तें निघेल, तिसऱ्यापासून जें सैन्य पाहिजे तें सिद्ध होईल, चवथ्यापासून

ज्या अलंकारांची इच्छा असेल ते प्राप्त होतील. असें सांगून रत्नें ब्राह्मणाकडे देता झाला. ब्राह्मणानें तीं चार रत्नें घेऊन विक्रमाजवळ येऊन सर्व वर्तमान सांगितलें. तेव्हां विक्रम त्या ब्राह्मणास ह्मणाला; तूं समुद्राजवळ जाऊन थोर कार्य केलेंस, तर तुला जें रत्न पाहिजे तें एक यांतून घे, ब्राह्मण ह्मणाला, मी आपले घरीं जाऊन सर्वांस विचारीन, नंतर जें घेणें तें घेईन. राजानें तीं चारही रत्नें त्याच्या स्वाधीन केलीं. मग तो ब्राह्मण आपल्या घरीं येऊन सर्वांस तें वर्तमान सांगता झाला. तेव्हां त्याची स्त्री ह्मणाली अन्नप्राप्तीचें रत्न घ्यावें; ह्मणजे आयास न करितां अन्न मिळेल. पुत्र बोलला सैन्य उत्पन्न होईल तें घ्यावें, कन्या ह्मणाली द्रव्यें करून सर्व अनुकूळ होतें तें आपल्या जवळ नाहीं ह्मणून बहुत श्रम करावे लागतात; यासाठीं द्रव्यप्राप्तीचेंच रत्न घ्यावें. सून ह्मणाली माझ्या अंगावर कांहीं वस्त्र नाहींत ह्मणून मला माझ्या वहिणी हिणवितात; तर ज्यापासून अलंकार उत्पन्न होतात तें घ्यावें. अशा सर्वांच्या इच्छा निरनिराळ्या होऊन चौघेंही कलह करूं लागलीं. तें पाहून ब्राह्मणानें चारी रत्नें विक्रमास परत देऊन सांगितलें कीं, राजा माझीं चार मनुष्यें आहेत त्या चौघांचीं बोलणीं चार प्रकारचीं प-

डतात, यास्तव मला एकही रत्न नको, तें ऐकून विक्रम त्या ब्राह्मणास तीं चारही रत्नें देऊन संतुष्ट करिता झाला. अशी कथा सांगून 'अपराजिता' ह्मणाली हे भोजराजा! याप्रमाणें तुझें औदार्य असेल तर या सिंहासनावर बैस; तेव्हां भोजराजा लज्जायमान होऊन आपल्या रंगमहालांत गेला. पुनः प्रातःकाळीं सिंहासनावर बसूं लागला, तों पांचवी पुतळी 'जयघोषा' बोलली. हे भोजराजा! विक्रमासारिखा उपकार जाणता तूं आहेस तर ह्या सिंहासनावर बैस; राजानें विचारिलें विक्रम उपकार जाणता कसा होता तें सांग. मग 'जयघोषा' सांगत्ये.—

## कथा ५ वी.

अवंतीनगरांत देवदत्त नामा एक ब्राह्मण अग्निहोत्री रहात असे, तो समिधा आणावयाकरितां अरण्यांत गेला होता. त्या दिवशीं विक्रमराजा त्याच अरण्यांत शिकारीस जाऊन एकटाच एका डुकरामागें लागला होता; तेव्हां तें डुकर पळून गेला, आणि राजा वाट चुकून इकडे तिकडे फिरूं लागला. तें देवदत्त ब्राह्मणानें पाहून राजास आपले आश्रमांत आणिलें. आणि फळें व उदक देऊन त्यांस स्वस्थ केलें

आणि आपण बरोबर येऊन नगरांत पोंचविलें. तेव्हां विक्रमानें त्या ब्राह्मणास बहुत द्रव्य देऊन सांगितलें, हे ब्राह्मणा ! हा तुझा उपकार माझ्यानें फिटणार नाहीं मी तुझा ऋणी आहे. मग तो ब्राह्मण संतुष्ट होऊन आपल्या घरास गेला. त्या दिवसापासून तो ब्राह्मण राजाचे घरीं येत जात असे. एके दिवशीं ब्राह्मण मनांत ह्मणतो कीं, राजा जें बोलला होता तें खरें किंवा खोटें याची प्रचीती पहावी ह्मणून त्यानें राजपुत्र लहान होता त्यास खेळावयाच्या निमित्तानें आपल्या कडेवर घेऊन कोणास न कळतां आपल्या घरीं नेऊन ठेविलें; तेव्हां राजपुत्रास कोणी नेलें, हें न समजून विक्रमादिक सर्व दुःखी झाले; आणि त्याचा शोध करूं लागले. तों त्या ब्राह्मणानें पुत्रावरचा एक अलंकार काढून सेवकाचे हातीं विकावयास दिला तो राजसेवकांनीं पाहिला आणि त्यास विचारिलें कीं, ही वस्तु तूं कोठून आणिलीस ? तेव्हां तो ह्मणाला देवदत्त ब्राह्मणानें मजजवळ विकावयास दिली. तें ऐकून राजसेवकांनीं देवदत्तास राजसभेस आणिलें; तेसमयीं विक्रमानें त्यास पुसलें ही वस्तु तुला कोठें सांपडली ? मग ब्राह्मण बोलला हे महाराज ! तुझा पुत्र मी लोभास्तव मारिला ही वस्तु त्याचे अंगावरील आहे, तें ऐकून सर्व लोक बोलूं लागले कीं, या दु-

ष्ट ब्राह्मणास बहुत शासन करावें. विक्रम ह्मणाला हे देवदत्ता! तूं माझा पुत्र मारिलास तथापि मी तुला शिक्षा करावी हें योग्य नव्हे. कां तर मी तुझा अगोदरचा उपकारी आहे, याप्रमाणें आपण करून पुत्राचा किमपि खेद न करितां त्या ब्राह्मणास विक्रम बहुत द्रव्य देता झाला. असा विक्रमाचा आचार पाहून देवदत्त संतुष्ट झाला, आणि पुत्रास आणून राजाच्या स्वाधीन करिता झाला, ही कथा सांगून 'जयघोषा' पुतळी ह्मणाली. हे भोजराजा! असा तूं उपकार जाणत असलास तर या सिंहासनावर पाय दे. तें श्रवण करून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं प्रधानादिक बरोबर घेऊन सिंहासनाजवळ आला. तेव्हां सहावी पुतळी 'लीलावती' बोलली, हे भोजराजा! विक्रमासारिखा तूं गुण जाणता असशील तर या सिंहासनावर बैस. राजानें विचारिलें विक्रमामध्यें गुणज्ञता कशी होती तें सांग. मग 'लीलावती' सांगत्ये.—

## कथा ६ वी.

विक्रमराजा राज्य करीत असतां एका जोहाऱ्यानें एक उत्तम रत्न आणून राजास दाखविलें, तें असें कीं ज्याच्या प्रकाशेंकरून पाहणाराचे डोळे दिपत असत. राजानें रत्नपा-

रखी बोलाविले त्यांनीं त्या रत्नाची किंमत कोटि रुपये केली. ते थोडे वाटून विक्रमानें त्या समयीं अठरा कोटि रुपये त्या जोहाऱ्यास देऊन आज्ञा केली कीं, अशींच आणखीं दहा रत्नें घेऊन एक महिन्याचे आंत ये; ती राजाज्ञा मान्य करून तो जोहारी देशांतरीं गेला, तेथून त्याप्रमाणें दहा रत्नें घेऊन येत असतां वाटेंत मोठा पर्जन्य पडून एका नदीस उतार होत नाहीं असें पाहिलें. तेव्हां जवळचे गांवांत गेला, तेथें रामदास सावकार होता त्याला आपलें वर्तमान सांगितलें. रामदास ह्मणाला, मला जर यांतलीं पांच रत्नें देशील तर मीं वाहनें देऊन तुला अवंतीस नेऊन घालीन. तें ऐकून जोहाऱ्यानें विचार केला कीं, यास जर रत्नें न दिलीं तर एक महिन्याच्या आंत यावें अशी राजाज्ञा आहे ती मोडेल, आणि राजास क्रोध येईल. कां कीं, राज्याचें फळ हेंच कीं, आज्ञा व्यर्थ होऊं नये. ह्मटलें आहे.—

आज्ञामात्रफलंराज्यंब्रह्मचर्यफलंतपः ॥
परिज्ञानफलाविद्यादत्तभुक्तफलंधनम् ॥ १ ॥

अर्थ—राजाची आज्ञा सर्वांनीं मान्य करावी हेंच राज्याचें फळ, ब्रह्मचर्य असावें हेंच तपाचें फळ. विद्याभ्यासाचें फळ हेंच

कीं ज्ञान व्हावें, धनाचें फळ हेंच कीं भोग आणि दान करणें; ह्मणून राजाज्ञा न मोडेल तें करून मग झालेला व्यवहार विक्रमास कळवावा. असा निश्चय करून पांच रत्नें त्या सावकारास देऊन त्याच्या नावेंत बसला आणि अवंतीनगरास जाता झाला. नंतर विक्रमापुढें पांच रत्नें ठेऊन तो जोहारी उभा राहिला. राजानें त्यास पुसलें कीं, दुसरीं पांच रत्नें कोठें आहेत! तेव्हां त्यानें हात जोडून राजास सर्व वर्तमान सांगितलें, आणि बोलला. महाराज! आपली आज्ञा पाळून व्हावी ह्मणून मी असें केलें; आणि तिसां दिवसांचे आंत आलों. तें ऐकून विक्रमानें विचार केला कीं, हा मोठा प्रामाणिक आणि बुद्धिमान होय. राजाज्ञा न पाळिल्यास मोठा दोष वडतो हें खरेंच आहे.

आज्ञाभंगोनरेंद्राणांविप्राणांमानखंडनम् ॥
पृथक्शय्याचनारीणामशस्त्रवधउच्यते ॥ १ ॥

अर्थ—राजाची आज्ञा मोडणें, ब्राह्मणाचा मानभंग करणें, कारणावांचून स्त्रीस निराळी निजविणें, हीं तीन्ही त्यांच्या वधासमान होतात. असें जाणून यानें पांच रत्नें सावकारास दिलीं; असा त्याचा गुण घेऊन विक्रमराजानें त्या जोहाऱ्या-

स आणलेलीं पांच रत्नें वक्षीस केलीं. ही कथा सांगून 'लीलावती' पुतळी ह्मणाली, हे भोजराजा! विक्रमासारिखे गुण तुजमध्यें नसतां व्यर्थ तूं या सिंहासनाची आशा कां धरितोस? तें ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला, तों 'मंजुघोषा' सातवी पुतळी बोलली; दुसऱ्याची इच्छा तृप्त करणें हा गुण विक्रमासारिखा तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस. तेव्हां त्यानें विचारिलें तो गुण त्यांत कसा होता तें सांग? मग 'मंजुघोषा' सांगत्ये.––

## कथा ७ वी.

विक्रम राजा एके दिवशीं वसंतऋतूमध्यें चंपकवनांत गेला. तें वन असें पाहिलें कीं, रम्यपुष्करणी अनेकप्रकारच्या कमळेंकरून युक्त; हंस, मयूर, कोकिला यांहीं करून सुशोभित; नानाप्रकारचे, वृक्ष वेली आणि जाई, जुई, चमेली, मालती, मोगरी इत्यादिकांनीं वेष्टित असें पाहून तेथें एक रमणीय बंगला बांधून त्यांत बहुत कारंजीं करवून स्त्रियांबरोबर जलक्रीडा करूं लागला. त्या वनांत एक तपस्वी तप करित होता; त्यानें तो राजाचा विलास पाहून आपल्या मनांत विचार केला कीं, ह्या लोकींचें सुख सोडून स्वर्गलोकीं-

च्या सुखाची इच्छा करणें त्यांत काय विशेष! येथें अनेक प्रकारचे कष्ट भोगून मेल्यानंतर त्या लोकींचे भोग भोगावे, त्यापेक्षां येथेंच विषयसुख भोगावें हें फार बरें दिसतें; असें मनांत आणून तो तपस्वी विक्रमाजवळ गेला. राजानें त्याचा सत्कार करून पुसलें कीं, आपली इच्छा काय आहे? तो बालला, हे राजा! मी देवीजवळ तप करित असतां देवीनें दृष्टांत दिला कीं, तूं तप पुरे कर, तुझ्या तपानें मी प्रसन्न झालें. तूं विक्रमाजवळ जाऊन संसारसुखाचा अनुभव माग; असा दृष्टांत झाला तो तुला सांगितला. संसारसुख भोगावयाविषयीं देवीची आज्ञा आणि माझीही इच्छा आहे, असें त्या तपस्व्याचें भाषण ऐकून विक्रम आपल्या मनांत ह्मणाला; याला देवी दृष्टांत देवो अथवा न देवो, परंतु यास माझी क्रीडा पाहून येथें आपण क्रीडा करावी अशी इच्छा झाली आहे; ती आपण पुरवावी. मग विक्रमानें तेथें मोठें नगर वसवून त्या नगरचा राज्याभिषेक त्या तपस्व्यास केला; आणि त्याचे उपजीविकेकरितां दुसरे बारा गांव त्यास दिले; तेणेंकरून तो तपस्वी संसार सुखातें अनुभविता झाला. ही कथा श्रवण करून भोजराजा अंतःपुरांत गेला. पुनः प्रातःकाळीं सिंहासनाजवळ येऊन उभा राहिला, तों 'जयसेना' आठवी

पुतळी बोलली, हे भोजराजा! विक्रमासारखें ज्याचें साहस-
कर्म असेल त्यानेंच ह्या सिंहासनावर बसावें, तेव्हां राजानें
विचारिलें त्याचें साहसकर्म कसें होतें तें सांग. मग 'जयसे-
ना' सांगत्ये.—

## कथा ८ वी.

अवंतीनगरांत विक्रम राजा राज्य करीत असतां, धनशे-
ट नामा एक सावकार अनेक व्यापार करून बहुत द्रव्य मि-
ळविता झाला. कोणे एके दिवशीं धनशेटीच्या शरीरास स-
माधान नाहींसें झालें तेसमयीं त्यानें विचार केला कीं, ह्या
मृत्युलोकची वस्ती फार अशाश्वत आहे, हें समजून शहा-
ण्यानें परलोकाचें साधन करावें, तें सोडून मूर्खजन पापकर्मे
करितात. आणि कोट्यावधि रुपये असले तरी आणखीं इ-
च्छितात, त्यांस चांगलें इहलोकसुखही प्राप्त होत नाहीं. आ-
णि पारलौकिक सुखाचाही लाभ नाहीं. तर आतां सर्व व्य-
वहार टाकून अपण दानधर्मादि पुण्यकर्म करावें हेंच बरें.
असा निश्चय करून तो सावकार कर्मविपाकादिक शास्त्रांप्र-
माणें सकळ दानें करून तीर्थयात्रेस गेला. तेथें बहुत धर्म
करून माघारा येत असतां त्यानें समुद्राचे कांठीं एक देवा-

ळय पाहिलें; त्यांत जाऊन देवीचें दर्शन घेतलें; तों तिचे डावे बाजूस स्त्रीपुरुषांचीं धडें व मस्तकें निराळीं होऊन पडलीं होतीं तींही पाहिलीं; आणि उजवे बाजूस एका चिऱ्यावर लिहिलेलें होतें कीं, जो पुरुष अचाटकरणीचा असेल त्यानें आपल्या हातानें आपलें शीर देवीचे पुढें तोडावें; ह्मणजे हीं स्त्रीपुरुषें जिवंत होतील. तें पाहून सावकार विस्मित होऊन अवंती नगरास आला, आणि देवीचा प्रसाद व कांहीं जवाहीर घेऊन विक्रमाच्या भेटीस गेला. ह्मटलें आहे.—

रिक्तपाणिर्नपश्येत्तु राजानंदेवतांगुरुम् ॥
दैवज्ञंभिषजंमित्रंफलेनफलमादिशेत् ॥ १ ॥

अर्थ.—कांहीं भेट नेल्यावांचून रिकाम्या हातीं राजा, देव, गुरु, ज्योतिषी, वैद्य आणि मित्र यांचें दर्शन घेऊं नये. आपल्या शक्तीप्रमाणें फलादिक जें अनुकूल असेल तें पुढें ठेवून काय बोलणें तें बोलावें. त्या सावकारानें भेट पुढें ठेविली, तेसमयीं विक्रमानें त्यास विचारिलें कीं, कोठें कांहीं चमत्कार पाहिलात असाल तर सांगा. तें ऐकून धनशेटीनें देवीजवळ पाहिलेला चमत्कार सांगितला. तेव्हां राजास फार आश्चर्य वाटलें, आणि त्या सावकारास बरोबर घेऊन त्या ठि

क्राणीं गेला; तों तेथें धनशेटीनें सांगितल्याप्रमाणेंच आहे-
तें पाहून विक्रमाचें हृदय त्या स्त्रीपुरुषांविषयीं बहुत कळव-
ळलें, आणि परोपकाराकरितां तो आपलें शिर तोडूं लागला,
तेव्हां देवी प्रत्यक्ष त्याचा हात धरून बोलिली हे विक्रमा!
तूं दुसऱ्यासाटीं आपला प्राण कां देतोस? राजानें उत्तर के-
लें, हे जगदंबे! सर्वांचें कल्याण असावें आणि सर्वांनीं सुखी
व्हावें असें माझ्या मनांत आहे; परंतु तें माझ्या स्वाधीन ना-
हीं, ह्मणून मी आपले प्राण अर्पण करितों कीं, जेणें करून
हीं स्त्रीपुरुपें उठून सुख पावतील. तें ऐकून देवीनें तीं स्त्रीपु-
रुपें जिवंत केलीं. मग विक्रम तेथील राज्य त्यांस देऊन आ-
पण अवंतीस येता झाला. ही कथा ऐकून भोजराजा खिन्न
होऊन माघारा गेला. पुनः प्रातःकाळीं सिंहासनाची पायरी
चढूं लागला, तों 'मदनसेना' नववी पुतळी बोलली. हे भोज-
राजा! विक्रमासारिखें तुझें धैर्य असेल तर या सिंहासनावर
तूं बैस. तें ऐकून त्यानें विचारिलें विक्रमाचें धैर्य कसें होतें तें
सांग? मग 'मदनसेना' सांगत्ये.—

## कथा ९ वी.

विक्रम राजा राज्य करीत असतां त्याचे जासूद कोठें का-

य आहे हें पहावयाकरितां सर्व देशांत फिरत असत. हें राजास योग्यच होय; ह्मटलें आहे.—

**गावः पश्यंति गंधेनवेदैःपश्यंति वाडवाः ॥**
**चारैःपश्यंतिराजानश्चक्षुर्भ्यामितरेजनाः ॥ १ ॥**

अर्थ.—वासानें पशु जाणतात, वेदानें ब्राह्मण पहातात, दूतद्वारें राजे जाणतात आणि इतर लोक प्रत्यक्ष नेत्रांनींच पाहून समजतात. असा तो राजा राज्य करीत असतां एके दिवशीं काश्मीर देशाहून जासूद आला, त्याणें वर्तमान सांगितलें कीं, काश्मीर देशांत निर्जळपूर नामें एक नगर आहे; त्यांत पाण्याचा मोठा दुष्काळ होता ह्मणून हरिदास सावकारानें लाखों रुपये खर्चून एक मोठें तळें बांधिलें; तेणेंकरून सर्व नगरास उदक पुष्कळ झालें; आणि तळ्यास पाट बांधिले त्या पाण्यानें जीं शेतें पिकूं लागलीं तीं ब्राह्मणांस दान दिलीं. कोणे एके दिवशीं असें झालें कीं, त्या तळ्यांत एक देवी येऊन राहिली, तिनें त्यांतील सर्व उदक शोषून तळें कोरडें पाडिलें. आणि सावकारास दृष्टांत दिला कीं, मी येथें येऊन राहिलें असतां मला तूं बळी दिला नाहींस; ह्मणून मी हें कृत्य केलें; आतां जर तूं मला बत्तीसलक्षणी पु-

रुपाचा बळी देशील तर मी संतुष्ट होऊन तळ्यांत सर्वदा अपार पाणी करीन. असें स्वप्न पाहून सावकारानें एकलक्ष रुपयांचा सुवर्णपुतळा करून तळ्यांत ठेविला; आणि त्याजवळ एक खांब पुरून त्यावर लिहिलें आहे कीं, जो बत्तीसलक्षणी पुरुष असेल त्यानें आपलें रक्त या तळ्यांतील देवीस देऊन तळ्यास पाणी लावावें,आणि हा सुवर्णाचा पुतळा घ्यावा. जासूद ह्मणतो हे महाराजा! असें वर्तमान मी आपल्या दृष्टीनें पाहून आलों. तें ऐकून विक्रम जासुदास घेऊन त्या तळ्याजवळ गेला. तेथें त्यानें सांगितल्याप्रमाणें पाहून त्या नगरांत एका ब्राह्मणाच्या घरीं उतरला, नंतर त्या ब्राह्मणाला ह्मणाला, तूं हरिदासाकडे जाऊन त्यास विचार कीं, ह्या तळ्यास पाणी लाविलें तर सोन्याचा पुतळा देऊन आणखीं काय देशील तें स्वहस्तें लिहून दे. ब्राह्मणानें सावकारास तसें पुसलें. तेव्हां त्यानें स्वसंतोषानें लिहून दिलें कीं, दुसरे पन्नास हजार रुपये देईन. तें पत्र घेऊन ब्राह्मण आला; रात्रौ विक्रमराजा हातांत ढाल तलवार घेऊन एकटाच तळ्यांत गेला, आणि जलदेवतेची स्तुती करून ह्मणाला, हे देवी! मी बत्तीसलक्षणी पुरुष तुला आपलें सर्व शरीर अर्पण करितों हें घेऊन लवकर जलानें तळें पूर्ण करावें असें बोलून ख-

ह्मानें आपलें शिर तोडूं लागला, तेव्हां देवी राजाचें धैर्य पाहून प्रसन्न झाली, आणि त्याचा हात धरून बोलली, हे विक्रमा! कांहीं वर माग. तो ह्मणाला, हें तळें सर्वदा उदकानें भरलेलें असावें एवढेंच मागतों. तें देवीनें मान्य करितांच तळें परिपूर्ण भरलें. नंतर विक्रमराजा त्या ब्राह्मणास सुवर्णाचा पुतळा आणि पन्नास हजार रुपये देऊन आपण अवंतीस येता झाला. ही कथा सांगून 'मदनसेना' ह्मणाली, हे भोजराजा! असें विक्रमाचें परोपकार करण्याविषयींचें धैर्य ऐकून अद्यापि त्याच्या सिंहासनावर बसावयाची इच्छा धरितोस तस्मात् तुजसारिखा अविचारी पुरुष दुसरा कोणीच नसेल. असें ऐकून भोजराजा अंतःपुरांत जाता झाला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला. तों 'मदनमंजरी' दहावी पुतळी बोलली हे भोजराजा! विक्रमासारिखा तुझा पराक्रम असेल तर या सिंहासनावर बैस. त्यानें पुसलें विक्रमाचा पराक्रम कसा होता? मग 'मदनमंजरी' सांगत्ये.—

## कथा १० वी.

विक्रमराजाचा उपाध्याय 'शंकरशर्मा' होता, त्याचा पुत्र कमलाकर नामा होता, तो सोळा वर्षांचा झाला तथापि कां-

हीं विद्याभ्यास करीना; ह्मणून त्याचा पिता ह्मणाला, अरे कमलाकरा! तूं मोठा झालास अझूनही विद्याभ्यास करीत नाहींस हें फार वाईट करितोस. कां कीं, विद्येवांचून पुरुषांचें जिणें व्यर्थ होय. ह्मटलें आहे.—

विद्यावित्तविहीनेनकिंकुलीनेनदेहिनाम् ॥
अकुलीनोपियोविद्वान्दैवतैरपिपूज्यते॥१॥

अर्थ—विद्यारूप धनानें रहित जो पुरुष तो मोठ्या कुलांतला असला तथापि त्यास कोणी पुसत नाहीं. नीच कुलांतही झालेला असून विद्वान् आहे तर त्याची पूजा देवही करितात. असा पित्याचा उपदेश ऐकून कमलाकरानें विचार केला कीं, पित्यानें जी गोष्ट सांगितली ती खरी आहे; विक्रमराजा पंडितांस बहुत धन देऊन सन्मान करितो, आणि मूर्खांशीं भाषणही करीत नाहीं; तस्मात् विद्येवांचून आपली प्रतिष्ठा होणार नाहीं, तर आतां देशांतरीं जाऊन विद्याभ्यास करावा हें बरें. मग तो काश्मीर देशास गेला; तेथें विलमभट उपाध्याय महाविद्वान् होता, त्याच्या घरीं जाऊन त्यास साष्टांग नमस्कार करून सर्व वर्तमान सांगता झाला. तेव्हां उपाध्यायानें त्यास जवळ ठेवून घेतला अस-

तां, त्यानें उपाध्यायाची सेवा केली, तेणें करून तो प्रसन्न होऊन त्यास सर्व विद्या सांगता झाला. ह्मटलें आहे.—

**गुरुशुश्रूषया विद्या पुष्कलेन धनेन वा ॥**
**अथवाविद्ययाविद्याचतुर्थंनोपलभ्यते ॥ १ ॥**

अर्थ—गुरुच्या सेवेकरून अथवा पुष्कळ धन देऊन किंवा आपली विद्या सांगून दुसऱ्याची विद्या घ्यावी. या तीन उपायावांचून विद्याप्राप्तीविषयीं चवथा उपायच नाहीं. नंतर तो कमलाकर बहुत विद्या शिकला, आणि गुरूची आज्ञा घेऊन आपल्या गांवास येत असतां वाटेंत कांतिपुरीस राहिला; तेथें नरमोहिनी नामें एक कलावंतीण फार सुंदर होती, तिला पाहून त्यास कामविकार झाला; तेव्हां तेथील लोकांनीं सांगितलें कीं, हिच्या घरीं जो पुरुष जातो त्यास राक्षस मारतो. तें ऐकून तो खिन्न होऊन अवंतीस आला, आणि राजाचें दर्शन घेतलें. राजानें विचारिलें कीं, देशांतरीं कांहीं नवल पाहिलें असेल तर सांगावें; तेव्हां कमलाकरानें नरमोहिनीचें वर्तमान सांगितलें. विक्रमानें मनांत विचार केला कीं, या ब्राह्मणाचें मन तिजकडे लागलें आहे. ह्मटलें आहे.—

**वेधाद्वेधाभ्रमंचक्रेकांतासुकनकेषुच ॥ तासुते**

व्यनासक्तःसाक्षाद्भर्गोनराकृतिः ॥ १ ॥

अर्थ.—ब्रह्मदेवानें मोहित करणारे पदार्थ दोन उपन्न केले; एक स्त्रिया व दुसरें धन. यांस पाहून जो मनुष्य भुलत नाहीं, तो केवळ महादेव जाणावा. मग विक्रम राजा त्या वेश्येचे गांवीं गेला, आणि रात्रौ राक्षसास मारून तीस सुखी केलें. दुसरे दिवशीं तिला करूलाकरासमोर उभी केली, तिचीं सर्व भूषणें काढविलीं, डोईचे केश मोकळे सोडविले; तेव्हां तिचें सौंदर्य फार उणें दिसूं लागलें. मग राजा ब्राह्मणास ह्मणतो ब्राह्मणा! अशीला पाहून तूं काय ह्मणून भुललास? अरे, हे स्तन मांसाचे गोळे आहेत, हें हिचें तोंड थुंकी व लाळ यांनीं भरलेलें आहे; अशा दुर्गंध पदार्थांचा अंगिकार करणें तो संततीकरितांच करावा. असा राजानें विषयाचा उपहास केला; तेणेंकरून ब्राह्मणाच्या मनांतील कामविकार शांत झाला. नंतर राजानें एक सुंदर स्त्री मेळवून ब्राह्मणाचें लग्न करून दिलें. ही कथा सांगून 'मदनमंजरी' ह्मणते हे भोजराजा! असा पराक्रम तुजमध्यें असेल तर या सिंहासनावर बैस. तें ऐकून तो माघारा गेला. दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला, तों 'शृंगारकलिका' नामें अकरावी पुतळी बोलली. हे भोजराजा! विक्रमासारिखें ज्याचें दयाळु-

त्व असेल त्याणेंच याजवर बसावें, इतरांस अधिकार नाहीं. त्यानें विचारिलें कीं, विक्रमाचें दयाळुत्व कसें होतें तें सांग ? तेव्हां 'शृंगारकलिका' सांगत्ये.—

## कथा ११ वी.

विक्रम राजा राज्य करीत असतां कोणी एक योगी नर्मदेच्या कांठीं योगाभ्यास करीत असे. त्यास राजानें पालखी पाठवून बोलाविलें; तेव्हां त्यानें उत्तर केलें कीं, मी विषयाची आशा सोडिली. आतां राजाजवळ यावयाचें मला काय प्रयोजन आहे. ह्मटलें आहे.—

आशायायेदासास्तेदासाःसर्वलोकस्य ॥
अशायेषांदासीतेषांदासायतेविश्वं ॥ १ ॥

अर्थ—जे आशेचे स्वाधीन झाले ते सर्व लोकांचे दास होतात; आणि आशा ज्यांचे स्वाधीन झाली त्यांचे सर्व लोक दास होताहेत; आणखी आशा धरिल्यानें पापेंहि घडतात. ह्मटलें आहे.—

लोभमूलानि पापानि व्याधयोरसमूलकाः ॥
स्नेहमूलानिदुःखानित्रयंत्यक्त्वासुखभिवेत्॥१॥

अर्थ—पापाचें मूळ लोभ, रोगाचें मूळ आवडेल तें खाणें,

दुःखाचें मूळ स्नेह होय; तस्मात् हीं तीन ज्यानें सोडिलीं तो सुखी होतो. असा त्याचा निरोप ऐकून विक्रमराजा त्याच्या दर्शनास गेला; आणि त्याची सेवा बहुत दिवस करिता झाला. एके दिवशीं योग्यानें संतुष्ट होऊन योगबलानें एक फळ उत्पन्न केलें; आणि हें भक्षिलें असतां मरण येई तोंपर्यंत शरीरास कांहीं रोग होणार नाहीं, असा त्याचा गुण सांगून फळ विक्रमास दिलें; तें घेऊन राजा अवंतीस येत असतां वाटेंत एक रोगी रक्तपितीनें हात पाय झडून पडला होता, त्यास पाहून विक्रमास कळवळा आला, आणि विचार करिता झाला कीं, याचें दुःख पाहून आपण सुखाची इच्छा करणें हें योग्य नव्हे. नंतर त्यानें तें फळ त्या रोग्यास दिलें, आणि आपण अवंतीस येता झाला. अशी कथा ऐकून भोजराजा सिंहासनापासून परतला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला, तों ‘ नरमोहिनी ’ बारावी पुतळी बोलली; हे भोजराजा! विक्रमासारिखे परोपकार तुझ्यानें होतील तर ह्या सिंहासनावर बैस. त्यानें विचारिलें कीं, विक्रमानें परोपकार काय केले ते सांग? मग ‘ नरमोहिनी ’ सांगत्ये.—

## कथा १२ वी.

विक्रम राजानें नियम केला होता कीं, सहा महिने राज्य

कारभार करून प्रजांचें संरक्षण करावें, आणि सहामहिने प्रधानाकडे कारभार सोंपवून आपण अनेक देशाटन करीत असावें, तेथें जे कोणी गरीब दुबळे आढळतील त्यांस दुःखापासून सोडवावें; असा काळ वांटिला होता, तेणेंकरून सर्व जन सुखी असत आणि राजाही निश्चितपणाचें सुख भोगीत असे.ह्मटलें आहे.—

मातासमंनास्तिशरीरपोषणं । भार्यासमंनास्तिशरीरतोषणं ॥ विद्यासमंनास्तिशरीरभूषणं । चिंतासमंनास्तिशरीरशोषणम् ॥ १ ॥

अर्थ—आईसारिखें शरीराचें संरक्षण करणारें दुसरें नाहीं; स्त्रीसारखें शरीरास सुख देणारें आणखी नाहीं; विद्येसारिखें शरीरास अन्य भूषण नाहीं, चिंते सारिखें शरीरास क्षीण करणारें दुसरें नाहीं.

अर्थातुराणांनापितानबंधुःकामातुराणांनभयंनलज्जा ॥ क्षुधातुराणांनबलंनतेजश्चितातुराणांनसुखंननिद्रा ॥ १ ॥.

अर्थ—द्रव्याची इच्छा ज्यांस फार आहे ते बाप आणि

भाऊबंद यांची भीड राखीत नाहींत; जे स्त्रीच्या व्यसनीं लागले त्यांस भय आणि लाज वाटत नाहीं; जे भुकेनें व्याकुळ त्यांस तेज आणि बळ नसतें; ज्यांस चिंता आहे त्यांस कोठेंही सुख होत नाहीं, आणि निद्रा येत नाहीं. एके समयीं राजा ज्योतिर्लिंगाचे दर्शनास जात असतां वाटेंत रात्रीस एका वृक्षाखालीं वस्तीस राहिला; त्या वृक्षावर अनेक देशींचे पक्षी बसून नानाप्रकारच्या गोष्टी बोलत होते; त्या ऐकूं लागला. राजास पक्ष्यांची बोली समजत असे. त्यांतलि एक पक्षी दुसऱ्यास सांगतो आहे. सेवाळ देशांत उमरबेट नामें नगर आहे तेथें एका राक्षसानें बहुत मनुष्यें भक्षिलीं; तेव्हां सर्वांनीं त्याची प्रार्थना केली कीं, हे समर्था! तूं अशीं माणसें मारशील तर कांहींका दिवसांनीं सर्व नाहींशीं होतील, मग तुझाच चरितार्थ चालणार नाहीं. तर आह्मीं तुला नित्यानें एक एक माणूस देत जाऊं तें खाऊन, तुवां स्वस्थ रहावें यांत तुझें आणि आमचें बरें आहे. तें राक्षसानें मान्य केलें. नंतर त्या नगरच्या लोकांनीं दरघरास पाळी लाविली, ती पाळी उद्यां एका फकिरावर आली आहे, तो फकीर बहुत पक्ष्यांस पोशीत असतो; त्यास राक्षसानें मारिल्यावर तेथें आह्मांस दाणा पाणी मिळणें कठिण आहे.

असें त्यांचें भाषण ऐकून सर्व पक्षी श्रमी होऊं लागले. त्यांचें दुःख पाहून विक्रमराजा त्याक्षणीं दिव्य पादुका पायीं घालून त्या नगरास गेला; आणि त्या फकिरास ह्मणाला, तूं बहुत जीवांचें पालन करितोस, आणि माझ्यानें कांहींच होत नाहीं, ह्मणून मी आपल्या जिवास कंटाळलों आहे. तर तुझ्या जागीं मी राक्षसापाशीं जातों. तें ऐकून तो ह्मणाला बावा ! तुझी इच्छा. मी तुला जा ह्मणून सांगणार नाहीं. मग विक्रम त्या राक्षसाचे जेवावयाचे शिळेवर जाऊन बसला. विक्रमास पाहतांच राक्षसाची दुष्ट बुद्धि गेली; आणि त्यास पुसतो, तूं कोण आहेस! राजानें उत्तर केलें तूं आपलें काम कर, माझी चौकशी कशास करितोस! राक्षस बोलला, नाहीं नाहीं; तुला पाहतांच माझी दुष्टबुद्धि गेली; तुझें धैर्य पाहून मी प्रसन्न झालों, काय पाहिजे तें माग. विक्रम ह्मणाला तूं आजपासून मनुष्यें खाऊं नको, तें मान्य करून तो राक्षस द्वीपांतरीं गेला; आणि विक्रमराजा अवंतीस आला. अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला. तों 'भोगनिधि' तेरावी पुतळी बोलली, हे भोजराजा! तुझें धैर्य विक्रमासारखें असेल तर

यावर बैस. भोजराजानें विचारलें विक्रमाचें धैर्य कसें होतें ! मग 'भोगनिधि' सांगत्ये.—

## कथा १३ वी.

विक्रम राजा राज्य करीत असतां अवंतीचे ठायीं कोणी एक भद्रसेन नामा सावकार मरण पावला, तेव्हां त्याचा पुत्र पुरंदरनामक विचार करिता झाला कीं, सर्व हें नाशिवंत आहे, जशी बापाची अवस्था झाली तशीच माझी होणार; असा विचार करून तो प्रपंचावर निस्पृह होऊन घरच्या सर्व संपत्ति ब्राह्मण, दीन, व अंध इत्यादिकांस देता झाला. ह्मटलें आहे.

उदारस्यतृणंवित्तंशूरस्यमरणंतृणम् ॥ विर
क्तस्यतृणंभार्यानिःस्पृहस्यतृणंजगत् ॥१॥

अर्थ—उदार पुरुषास द्रव्य तृणवत्, शूरास मरण, विरक्तास स्त्री, निस्पृहास सर्व जग तृणाचे परी तुच्छ वाटतें. या प्रकारें तो विरक्त होऊन तीर्थयात्रा करावयास जाता झाला. कोणे एके रात्रीस भद्रेश्वर नामक देवाचे देवळांत राहिला होता; तेथें रानांत कोणी मोठ्यानें रडूं लागलें, तें ऐकून त्यानें तेथील राहाणारास पुसलें कीं, हें कोण रडतें ? लोक ह्मणाले

आह्मीही असेंच नित्य ऐकतों; परंतु आमच्यानें रात्रीं अरण्यांत जाऊन शोध करवत नाहीं; जो मोठा धैर्यवान असेल तोच याचा शोध करील. पुरंदर यात्रा करून अवंतीस आला; तेव्हां त्याणें ती गोष्ट विक्रमास सांगितली; ती ऐकून राजा त्यास बरोबर घेऊन त्या देवळांत गेला. तेथें रात्रीस रडणें ऐकून त्याच्या सुमारानें अरण्यांत गेला, तों मोठा एक राक्षस एका स्त्रीस मारितो आणि ती रडत आहे; असें पाहून राजा त्यास ह्मणतो, अरे दुष्टा! ही गरिव स्त्री, इला तूं कां व्यर्थ मारितोस? तुजमध्यें सामर्थ्य आहे तर ये मशीं लढ; पाहूं तुझा पराक्रम. असें ऐकतांच तो राक्षस चालून आला, तेव्हां विक्रमानें युद्ध करून त्यास मारिलें, आणि त्या स्त्रीस विचारिलें तूं कोण? तुला हा कां छळीत होता? ती सांगते मी ब्राह्मणी आहें, मी आपल्या पतीस बहुत गांजीत होतें ह्मणून रागानें त्यानें प्राण दिला; आणि राक्षस होऊन मला नित्य मारीत होता, त्या दुःखापासून आज मला तूं सोडविलेंस, मी तुझी फार उपकारी झालें. तर पतीचें द्रव्य बहुत आहे तें सर्व तुला मी देतें. असें बोलून मोहोरांचे सात हांडे राक्षसानें रानांत पुरून ठेविले होते ते दाखविले. विक्रम राजा दुसरे दिवशीं तें सर्व द्रव्य गरीबगुरीबांस देऊन आपण अवं-

तीस येता झाला. अशी कथा ऐकून भोजराजा माघारा जाता झाला. दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला, तों 'रतिप्रिया' चौदावी पुतळी बोलली, हे भोजराजा! विक्रमासारखा दाता असेल तोच या सिंहासनावर बसेल; इतरांस अधिकार नाहीं. तें ऐकून त्यानें ह्मटलें, विक्रमाचें दातृत्व कसें होतें तें सांग? मग 'रतिप्रिया' सांगत्ये—

## कथा १४ वी.

राजा विक्रम देशाटन करीत असतां कृष्णातीरीं गेला, तेथें पुराण कथन चाललें होतें तें ऐकत बसला. त्यासमयीं पुराणिकानें हा श्लोक वाचिला.—

परोपकारायफलंतिवृक्षाःपरोपकारायवहंतिनद्यः ॥ परोपकारायदुहंतिगावःपरोपकारार्थमिदंशरीरम् ॥ १ ॥

अर्थ—परोपकारासाठीं वृक्ष फळतात, परोपकारासाठीं नद्या वाहतात, गाई परोपकारासाठीं दूध देतात आणि हें शरीर परोपकारासाठींच ईश्वरानें दिलें आहे. इतक्यांत एक ब्राह्मण पलीकडून स्त्रीस घेऊन येत होता, तो कृष्णेंत बुडूं लागला; तेव्हां त्यानें पुराणास लोक बसले होते त्यांस बहुत

हांका मारिल्या, परंतु त्यास काढावयास कोणी गेला नाहीं. तेव्हां विक्रमानें नदींत उडी घातली, आणि त्यास बाहेर काढिलें. मग तो ब्राह्मण राजास ह्मणतो मी आज स्त्रीसहित प्राणास मुकत होतों तो तुझ्या योगानें वांचलों तर मी जें बारा वर्षें तप केलें आहे, त्याचें पुण्य तुला दिलें; असें ह्मणून तो राजाच्या हातीं उदक घालता झाला. नंतर विक्रम अवंतीस येत असतां वाटेंत विकाळ स्वरूप एक ब्रह्मराक्षस उभा राहिला आणि ह्मणाला, हे महापुरुषा! मी या ब्रह्मराक्षसयोनींत दुःख पावलों माझा उद्धार कर; तें ऐकून राजानें ब्राह्मणानें दिलेलें पुण्य त्या ब्रह्मराक्षसास दिलें. तेणेंकरून तो पापापासून मुक्त होऊन स्वर्गास गेला. आणि विक्रम अवंतीस येता झाला. अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला; तेव्हां 'सुमित्रा' नामें पंधरावी पुतळी बोलली, हे भोजराजा! विक्रमासारिखा तुझा ईश्वरावर भरंसा असेल तर या सिंहासनावर बैस. त्यानें विचारिलें; विक्रमाचा देवावर भरंसा कसा होता! मग 'सुमित्रा' सांगत्ये.—

## कथा १९ वी.

विक्रमराजा तीर्थयात्रा करीत असतां कोणे ऐके समयीं

आंवव्याजगन्नाथास गेला. तेथें देवळांत एक योगी होता त्यानें त्यास ओळखिलें; आणि विचारिलें, हे विक्रमा! तूं राज्य टाकून असा कां फिरतोस? विक्रम बोलला, आपणासारिख्या साधूंचें दर्शन घ्यावयास फिरतअसतों. योगी ह्मणतो, तिकडे कोणी शत्रु आल्यास तुझें राज्य कोण रक्षील? जरी प्रधानादिक असले तरी धन्यावांचून त्यांस तेज असत नाहीं. विक्रम ह्मणतो, ही चिंता मी कशास करूं? ज्यानें मला राज्य दिलें त्यास त्याची काळजी आहे; याविषयीं मी एक कथा सांगतों, ती ऐकावी.—

पूर्वीं जयखंड नगरींत जयशंकर नामा राजा राज्य करीत होता, एके समयीं दायादांनीं त्याचें राज्य कपटानें घेऊन त्यांस गांवावाहेर लावून दिलें. मग तो देशोदेशीं फिरत असतां भद्रावती नगराजवळ रात्रौ एके वडाखालीं निजला. त्या वडावर पांच यक्ष रहात होते, ते आपआपल्यांत बोलूं लागले, ह्या नगरीचा राजा मरण पावला आहे. त्यास पुत्र नाहीं; आतां हें राज्य कोणास द्यावें? त्यांतील एक बोलला; हीं स्त्रीपुरुषें फार संकटांत आहेत; यांसच देऊं या. तें सर्वांनीं मान्य केलें. तें ऐकून राजा दुसरे दिवशीं स्त्रीला घेऊन त्या नगरांत गेला; तों तेथें प्रधानादिकांनीं हत्तीण

त्याला माळ घालील तो राजा करावा; असा निश्चय करून सोंडेंत माळ देऊन हत्तीण सोडिली होती; तेव्हां यक्षांनीं आपल्या सामर्थ्यानें हत्तिणीकरवीं शंकरराजाच्या गळ्यांत माळ घालविली. मग प्रधानांनीं त्यास राज्याभिषेक केला. असा तो राजा राज्य करीत असतां त्यावर शत्रू चढून आला, त्या समयीं जयशंकर राजाची स्त्री ह्मणाली हे महाराज! परचक्रानें सर्व नगरास वेढा घातला; अद्यापि आपण कांहीं उद्योग करीत नाहीं; याचें कारण काय? त्यानें उत्तर केलें ज्यांनीं मला राज्य दिलें तेच यक्ष रक्षण करतील. मी कशास काळजी करूं? असें बोलून जयशंकरराजा स्वस्थ बसला. मग यक्ष आपल्या मनांत ह्मणतात कीं, याणें आमच्यावर विश्वास ठेविला आहे, तर आह्मांस याचें राज्य रक्षण करणें प्राप्त आहे. नंतर यक्षांनीं आकाशांतून पाशाणवृष्टी करून परचक्राचा पराभव केला, तें कौतुक पाहून राणी बोलली, हें कर्म यक्षांवांचून दुसऱ्याचें नव्हे. बरें एवढे उपकार यक्ष आह्मांवर कां करितात? असें बोलत असतां तेथें यक्ष येऊन ह्मणाले आह्मीं पूर्वजन्मीं कांहीं एक दोषास्तव मत्स्य होऊन लहानशा तळ्यांत पाण्यावांचून घाबरे होऊं लागलों तेव्हां हा तुझा पति कुंभार होता, याणें आह्मांस मोठ्या स

रोवरांत नेऊन सोडिलें; तो उपकार स्मरून आह्मी यास राज्य दिलें आणि संरक्षणही केलें. असें त्यांचें भाषण ऐकून राजानें त्यांस नमस्कार केला; नंतर ते आपल्या स्थानास गेले. ही कथा ऐकून योग्यानें प्रसन्न होऊन विक्रमास चिंतामणी रत्न दिलें. तें घेऊन तो उज्जयनिस येत असतां वाटेंत एक ब्राह्मण येऊन ह्मणाला, मी दरिद्रानें बहुत त्रासलों, माझें दारिद्र दूर करावयास तूं समर्थ आहेस; तें ऐकून विक्रम त्यास चिंतामणी देऊन आपल्या नगरास गेला. ही कथा श्रवण करून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तों 'प्रेमावती' सोळावी पुतळी बोलली हे भोजराजा! विक्रमासारखें ज्याचें सामर्थ्य असेल तोच याजवर बसेल. मग भोजराजा पुसूं लागला, विक्रमाचें सामर्थ्य कसें होतें? मग 'प्रेमावती' सांगत्ये.—

## कथा १६ वी.

विक्रमाचा एक मित्र सुमती नामा होता, तो काशीयात्रा करून अवंतीस येत असतां वाटेंत एका देवालयांत उतरला; तेथें एक कढई तेलानें भरून तिच्या खालीं जाळ लाविला होता आणि लग्नाचें सर्व साहित्य करून ठेविलें होतें; तें पा-

हून सुमतीनें लोकांस विचारीलें कीं, येथें काय आहे? त्यांणीं सांगितलें; या गांवांत राजकन्या मदनमंजरी बहुत सुंदर आहे तिणें नियम केला आहे कीं, जो या कढईत उडी टाकून जीवंत निघेल त्याची मी स्त्री होईन आणि सर्व राज्य त्यास देईन. यासाठीं बहुत राजपुत्र आले आहेत, कितीएक या कढईंत उडी टाकून मेले. असें लोक सांगताहेत, तों मदनमंजरी देवीच्या दर्शनास आली तीला पाहतांच सुमती बहुत मोहित होऊन मनांत ह्मणतो; अहा!! काय हें सौंदर्य! अशी सुंदर स्त्री ज्यास मिळेल तो धन्य, तो पुण्यवान्! व्यर्थ माझा जन्म! असा तो तिच्या चिंतेनें फार शुष्क होऊन अवंतीस आला. विक्रमाची भेट झाली तेव्हां त्याणें विचारीलें सख्या तूं शुष्क कां झालास? त्याणें मदनमंजरीचें वर्तमान सांगितलें; तें ऐकून विक्रम मनांत ह्मणतो, हा माझा मित्र याचें दुःख दूर करावें हें मला योग्य होय. संकटकाळीं जो मित्र कामास न पडे तो मित्र कशाचा? नंतर तो सुमतीस ह्मणतो, सख्या! मदनमंजरीच्या गांवास जाऊं चल; तें ऐकून सुमतीस बहुत आनंद झाला. मग दोघेजण योगपादुकांवर बसून त्या देवळांत गेले, तेथें सुमतीनें सांगितल्याप्रमाणें पाहून राजा त्या कढईजवळ गेला. इतक्यांत मदनमंजरी तेथें

आली आणि विक्रमास पाहून आपल्या मनांत खिन्न होऊन ह्मणते, हाय! हाय! असा दिव्य पुरुष मजकरितां आला आणि आतां माझी दुष्टप्रतिज्ञा पाहून माघारां जाईल. मग ती राजास ह्मणाली हे महापुरुषा! मी मनासारिखा पति मिळावा ह्मणूनच अशी प्रतिज्ञा केली होती. ती आतां राहो, मी तुला वरत्यें. विक्रम बोलला हें ठीक नव्हे, जर कां मी कढईत उडी न घालितां तुझा पती झालों तर यांत दोघांचीही अपकीर्ती होईल, आणि सर्व लोक हंसूं लागतील; ह्मणून तुझी प्रतिज्ञा मी शेवटास नेतों; नंतर तुला मी सांगेन तसें कर. असें तिशीं बोलून विक्रमानें वेताळाचें स्मरण करून त्याकढईंत उडी टाकिली, ते समयीं वेताळानें अमृत शिंपून राजास बाहेर काढिला; तो बाहेर येतांच पहिल्यापेक्षां अधिक सुंदर दिसूं लागला, तेव्हां मदनमंजरी त्यास नमस्कार करून बोलली, राजा! तुझा जयजयकार असो. तुझ्या सारिख्या अवतारी पुरुषांचे आधारानेंच पृथ्वी राहिली आहे. ह्मटलें आहे.—

ये दीनेषु दयालवःस्पृशति यानल्पोपि न श्री

मदो व्यग्रा ये च परोपकार करणे हृष्यं ति

ये याचिताः ॥ स्वस्थाःसंति च यौवनोन्म
दसहाव्याधिप्रकोपेपि यैस्तैःस्तंभै रिव सुस्थि
रैः किल भरक्रांता धरा धार्यते ॥ १ ॥

अर्थ—जे पुरुष दिनांचे ठायीं दयाळू, ज्यांस संपत्तीनें गर्व होत नाहीं, जे परोपकार करण्याविषयीं सर्वांचे पुढें, कोणी कांहीं मागितलें असतां ज्यांस हर्ष होतो आणि तारुण्याचे भरामध्यें असतां उन्मत्त होऊन ज्यांचें चित्त चचंळ होत नाहीं, ते पुरुष मला वाटतें कीं, पृथ्वीचे टेंके होत. अशी मदनमंजरीनें विक्रमाची स्तुति केल्यानंतर तो तीस ह्मणाला, तूं माझ्या मित्राची स्त्री हो. ती बोलली मी तुझीच स्त्री होईन दुसऱ्यास पती करणार नाहीं. विक्रम ह्मणाला तूं सांगशील तें मी ऐकेन असें तूं अगोदर मान्य केलेंस, ह्मणून मी एवढें हें साहसकर्म केलें. तर आतां तुला माझें ह्मटलेलें करणें प्राप्त आहे. तें ऐकून मदनमंजरी निरुपाय झाली आणि तिणें सुमित्रास वरिलें. मग विक्रमराजा सुमित्रास तें राज्य देऊन आपण अवंतीस आला. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं आला असतां 'सुप्रभा' नांवाची सत्रावी पुतळी ह्मणाली, राजा!

विक्रमा सारिखें दान तुझ्यानें होईल तरच या सिंहासनावर बैस. त्याणें विचारिलें, विक्रमानें दान कोणास कसें काय केलें? तेव्हां सुप्रभा सांगते—

## कथा १७ वी.

राजा विक्रम कोणे एके दिवशीं शिकारीस गेला होता; तो मोठा एक डुकर पाहून त्याच्या पाठीस लागला असतां डुकर पर्वताचे गुहेंत शिरला ह्मणून त्याच्या पाठीमागें राजा ही गुहेंत गेला. तों तेथें पाताळांत जाण्याचा मार्ग होता तो पाहून त्याणें विचार केला कीं, या विवरांत उतरलें असतां कोठें जातें पाहूं या: मग तो विराच्या खांद्यावर बसून त्या मार्गानें गेला तों पाताळांत पावला. तेथें बळीचे दाराजवळ शंख,चक्र,गदा,पद्म अशी चार आयुधें हातांत घेऊन विष्णु उभा होता त्यास पाहिलें आणि साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां विष्णुनें विक्रमास आलिंगन देऊन बळीचे घरांत नेला. मग बळीनें त्यास आपल्या जवळ बसवून विचारिलें; तूं येथें कोणीकडे आला आहेस? विक्रम ह्मणाला आपलें आणि श्रीविष्णुचें दर्शन व्हावें ह्मणून आलों, ती माझी इच्छा परिपूर्ण झाली. मग उभयतानीं नानाप्रकारच्या

गोष्टी केल्यानंतर बळीनें विक्रमास सांगितलें कीं, माझे राज्यांतील तुला जी वस्तु पाहिजे ती माग मी देईन. तें ऐकून विक्रम ह्मणाला, महाराज! तुमचें दर्शन झालें यांत माझे सर्व मनोरथ परिपूर्ण झाले; दुसरें मला कांहीं नको. बळी ह्मणतो विक्रमा! तूं संकोच धरितोस, तुला माझे मैत्रीची आठवण रहावी असें माझ्या मनापासून आहे, यासाठीं तुला आवडेल तें मी द्यावयास सिद्ध आहें ह्मटलें आहे–

ददातिप्रतिगृण्हातिगुह्यमाख्यातिपृच्छति ॥
भुंक्तेभोजयतेचैवषड्विधंप्रीतिलक्षणम् ॥ १ ॥

अर्थ—आपली वस्तु मित्रास देतो, मित्रानें जी दिली ती घेतो, आपली गुजगोष्ट मित्रास सांगतो, मित्राची आपण पुसतो, मित्राचे घरीं जेवावयास जातो, आणि त्यास आपल्या घरीं जेवावयास बोलावितो; हे सहा प्रकार प्रीतीचे आहेत. याप्रमाणें बळी बोलला असतां विक्रम उगाच राहिला. नंतर बळीनें सर्पाच्या मस्तकावरचा एक अमोलिक मणि विक्रमास दिला. तो घेऊन, विक्रम गेलेल्या मार्गानें माघारा भूतळावर आला; आणि अवंतीस येत असतां वाटेंत एक ब्राह्मणानें त्याची प्रार्थना केली, राजा! मी फार

दरिद्री आहें, माझें दरिद्र दूर कर, तें ऐकून राजास त्याची दया आली आणि जवळील दिव्य मणि होता तो देऊन त्या ब्राह्मणास संतुष्ट केलें. अशी कथा ऐकून भोजराजा माघारां गेला. पुनः दुसरे दिवशीं आणखी विक्रमाची कीर्ति श्रवण करण्याकरितां सिंहासनाजवळ आला. तों 'कुरंगनथना' अठरावी पुतळी बोलली राजा! विक्रमासारिखा परोपकार तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस. त्याचा परोपकार कसा होता तो मी सांगत्यें ऐक.-

## कथा १८ वी.

कोणी एका ब्राह्मणानें चंद्रसेन राजाजवळ विक्रमाची स्तुति केली, ती ऐकून त्यानें मनांत आणिलें कीं, विक्रम आपला शत्रू होय; तर त्यापेक्षां आपली कीर्ती अधिक होईल तें करावें; असा निश्चय करून चंद्रसेनानें देवीजवळ तपश्चर्या केली; तेव्हां देवीनें प्रसन्न होऊन त्यास वर दिला कीं, तूं आपल्या शरीराची आहुति दे ह्मणजे मी तुझ्या भारंभार सोनें देत जाईन. त्यावरून तो राजा बहुत वेळ अग्नींत उडी टाकीत होता आणि वराप्रमाणें देवी त्यास जीवंत करून त्याचे भारंभार सुवर्ण देत होती; नितकेंही सोनें

तो विक्रमाच्या ईर्षेस्तव ब्राह्मणांस देत असे. हें वर्तमान वि-
क्रमास कळलें, तेव्हां त्यानें विचार केला कीं, चंद्रसेनराजा
माझे इर्षेस्तव एवढें दुःख भोगितो, तर आपंण त्याचें दुःख
दूर करावें; असा निश्चय करून तो त्या देवीजवळ गेला
आणि तिची प्रार्थना करून ह्मणतो, हे जगदंबे! तूं सर्वांचें
दुःख दूर करतेस अशी तुझी कीर्ति लोकांमध्यें गाजत आहे;
तर आतां माझ्या देहाची एकदांच आहुति घेऊन चंद्रसेनास
अक्षय लक्ष्मी द्यावी; त्यास वारंवार अग्नींत पडावयाचा श्र-
म देऊं नये, अशी प्रार्थना करून विक्रमानें अग्निकुंडांत उडी
टाकिली; तेव्हां देवी प्रसन्न झाली आणि त्यास जिवंत क-
रून ह्मणते हे राजा! तुजसारिखा परोपकारकर्ता दुसरा को-
णी होणार नाहीं. दुसऱ्याचें दुःख दूर करण्यासाठीं आप-
ल्या प्राणांवर उदार होणें हें फार कठीण आहे; त्यांतही
चंद्रसेन तुझा द्वेष करीत असतां तूं त्यास दुःख न व्हावें
ह्मणून आपला प्राण दिलास तस्मात् तुझी बरोबरी करणारा
कोण आहे? राजा! तर आतां तुझी प्रार्थना मीं मान्य केली
असें बोलून देवी गुप्त झाली. आणि विक्रम राजाही अवं-
तीस गेला. अशी कथा ऐकून भोजराजा माघारां गेला.
पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां एकुणिसावी

पुतळी 'चंद्रज्योति' बोलत्ये हे भोजराजा विक्रमासारिखें दुर्घट कर्म तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस. तें ऐकून भोजराजा विचारितो त्याणें दुर्घट कर्म कोणतें केलें तें सांग मग चंद्रज्योति सांगत्ये.—

## कथा १९ वी.

राजा विक्रम राज्य करीत असतां कोणी एक ब्राह्मण विंध्यापर्वतावरून येऊन राजास भेटला; राजानें त्यास विचारलें; आपण कांहीं चमत्कार पाहिला असेल तो सांगावा. ब्राह्मण बोलला राजा! मी जो चमत्कार पाहिला आहे तो तुला सांगितला असतां खोटा वाटेल ह्मणून मी सांगावयास आशंकतों. असें ऐकून राजानें बहुतच आग्रह केला, तेव्हां तो ब्राह्मण सांगूं लागला, राजा! ऐक. मी पृथ्वीप्रदक्षिणा करावयास निघालों तों विंध्याचलावर पावलों; तेथें एक तळें पाहिलें, त्या तळ्यांत एक खांब आहे त्यावर रत्नजडित सिंहासन आहे, तो खांब सूर्य उगवला ह्मणजे दिसूं लागतो; मग जसजसा सूर्य चढतो तसतसा तो खांब उंच वाढत जातो. तेथील लोक असें सांगतात कीं, माध्यान्हीं सूर्य त्या खांबावरच्या सिंहासनावर बसून अमृत प्राशन करीत असतो; नं-

तर सूर्य जसजसा उतरतो तसतसा तो खांब पाण्यांत बुड-
तो; सूर्य मावळतांच खांब दिसेनासा होतो. त्या तळ्यांत
जो स्नान करितो त्याची सर्व पापें जातात. हें ब्राह्मणाचें
भाषण ऐकून विक्रमास बहुत आश्चर्य वाटलें. मग आपण
योगपादुका पायांत घालून त्या तळ्याजवळ गेला. तेथें
दिवस उगवतांच ब्राह्मणानें सांगितल्याप्रमाणें खांब दिसूं ला-
गला; त्यास नमस्कार करून विक्रम त्यावर जाऊन बसला;
तोंडानें सूर्यमंत्राचा जप करितो आहे; मग जसजसा खांब
उंच जाऊं लागला; तसतसा विक्रमास अधिक दाह होऊं
लागला तों प्रहर दिवस येतांक्षणीं प्राण कासावीस होऊन
मरण पावला नंतर दोनप्रहरीं सूर्य त्या सिंहासनावर बसून
अमृत प्राशन करीतअसतां त्याणें अमृत शिंपून विक्रमास
जिवंत केलें. ते समयीं विक्रमानें स्तुति करून सूर्यास प्रसन्न
केला तो वर माग ह्मणाला तेव्हां विक्रमानें प्रार्थना केली. हे
देवा! तुझें दर्शन होणें दुर्घट, तें होऊन तुजशीं भाषण झालें,
आतां आणखीं काय मागूं? तें ऐकून सूर्यानें आपले कानां-
तील कुंडलें काढून विक्रमास दिलीं आणि सांगितलें या कुं-
डलांपासून नित्य एक भार सोनें उत्पन्न होईल, असें बोलू-
न सूर्य आकाशीं गेला. सायंकाळीं विक्रम पृथ्वीतळीं येऊन

अवंतीस जात असतां वाटेंत त्याणें एक ब्राह्मण कुटुंबवत्सल व अत्यंत दरिद्री पाहिला; तेव्हां त्यास तीं सूर्यानें दिलेलीं कुंडलें अर्पण केली, आणि आपण अवंतीस आला. ही कथा ऐकून भोजराजा माघारां गेला. पुनः दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तों 'चंद्रकांति' विसावी पुतळी बोलली कीं, विक्रमासारिखें साहसकर्म तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस. तें ऐकून त्याणें विचारिलें कीं, विक्रमानें कोणतें साहसकर्म केलें ! तेव्हां 'चंद्रकांति' सांगत्ये.—

## कथा २० वी.

कोणी एक माधवनामा ब्राह्मण बहुत चतुर, गाणारा व स्वरूपवान् असा होता, त्याणें ज्या राजाजवळ जावें त्या राजाचे मनांत यावें कीं, हा मदनासारिखा सुंदर आणि गुवान् आहे; यास पाहून आपल्या स्त्रिया मोहित होतील. याजकरितां याला आपल्या राज्याबाहेर लावून द्यावा. असें बहुत ठिकाणीं झालें ह्मणून तो माधव पश्चाताप पावून तीर्थयात्रा करीत असतां फिरतफिरत देवनगरीस आला. तेथें कामसेन राजाचे घरीं कामकंदला नामें कलावंतीण नृत्य करीत व गात होती, तेथें दरवाज्यांत उभा राहिला आणि

तें गायन ऐकून बोलला कीं, गायन करणारी तर बहुत चतुर आहे; परंतु ऐकणारे सर्व मूर्ख आहेत असें दोन तीन वेळां बोलला तें सेवकानें राजास सांगितलें; राजा सेवकास ह्मणाला त्यास विचार कीं, तूं सर्वांस मूर्ख ह्मणतोस हें कसें तें सांग. सेवकानें तसें विचारलें, तेव्हां माधव ह्मणाला, येथें जो मृदंग वाजवितो आहे त्यास आंगठा नाहीं ह्मणून त्याची थाप चांगली उठत नाहीं, इतकें या गाण्यांत उणें आहे; तें कोणाचे लक्षांत येत नाहीं, सेवकानें तें राजास सांगितलें असतां राजानें चौकशी केली, तेव्हां समजलें कीं मृदंगी याणें मेणाचा आंगठा लाविला आहे. मग कामसेन राजानें दुसरा मृदंगी आणवून माधवास वस्त्रें भूषणें देऊन सभेंत आणून बसविलें; आणि कामकंदलेस सांगितलें कीं, ब्राह्मण फार चतुर आहे तर जितका तुझ्यांत गुण असेल तितका आज यास दाखीव; तें ऐकून तिणें उत्कृष्ट नाच व गायन केलें. तो तिचा गुण पाहून माधव फार प्रसन्न झाला आणि वाहवा ह्मणून राजानें दिलेलें सर्व त्याणें तिला दिलें तें राजास न साहून त्याणें सेवकांस आज्ञा केली कीं, या क्षणीं यास गावांबाहेर लावून द्या. आज्ञा होतांच तितके रात्रीं सेवकांनीं त्यास गावांबाहेर नेऊन सोडिला. ते समयीं

माधव एका झाडाखालीं बसून विचार करितो.

मातायदि विषंदद्याद्विक्रीणातिपितासुतम् ॥
राजाहरति सर्वस्वंतत्रकापरिदेवना ॥ १ ॥

अर्थ—जर कां आईच विष देईल, अथवा बापच पुत्रास विकील, किंवा राजाच जर सर्वस्व हरील तर तेथें कोणाचा उपाय चालणार आहे! असा तो चिंता करीत बसला आहे; तों इकडे कामकंदला नाच करून घरास आली आणि आपल्या चांकरांस ह्मणाली; त्या ब्राह्मणास शोध करून या क्षणीं घेऊन या; तें ऐकून तितके रात्रीस सेवकांनीं शोध करून माधवास तिचे घरीं नेला. नंतर ती फार श्रमी होऊन बोलली कीं, माधवा! मजकरितां तुझा अपमान झाला, तर आतां जितका वेळ आनंदांत जाईल तितका घालवूं या. प्रातःकाळीं तुजकरितां राजानें जरी माझा प्राण घेतला तरी मला मान्य आहे. असें ह्मणून तिणें गायनास आरंभ केला. तें सुस्वर गायन ऐकून माधवास वाटलें कीं, ही कोणी स्वर्गीची अप्सराच आली आहे काय? मग तिचें गाणें संपल्यावर माधवानें गाइलें; तें ऐकून कामकंदलेचा गर्व जाऊन तिचे अंगावर रोमांच उभे राहिले आणि डोळ्यांवाटे आनंदाश्रुंच्या

धारा चालूं-लागल्या. तेव्हां तीस वाटलें कीं, हा कोणी साक्षात् गंधर्वच आहे काय? याप्रमाणें तीं उभयतां गायनाचे रंगांत होतीं इतक्यांत पाहांट झाली, तेव्हां माधवास राजाज्ञेचें स्मरण होऊन तो कामकंदलेस बोलला आतां मी जातों, नाहीं तर मजकरितां राजा तुला यातना करील. कामकंदला बोलली माधवा! तुझेसारिखा गायनाचा भोगी सोडून मी या मूर्खाजवळ या उपरांत रहात नाहीं; मी तुझे बरोबर येत्यें. माधव ह्मणाला ही गोष्ट सध्यां अवघड आहे. ईश्वराचे इच्छेनें जेव्हां घडेल तेव्हां घडो; परंतु आतां तर मी निघून जातों; मागाहून नेण्याचा यत्न करीन. तें ऐकून तीस बहुत दुःख झालें, माधवासही गहिंवर आला, मग तो तसाच उठून रडत रडत गांवाबाहेर गेला. नंतर तिच्या वियोगानें अत्यंत दुःखित असा देशोदेशीं फिरत असतां त्रिक्रमाची कीर्ति ऐकून अवंतीस आला आणि एका देवळांत राहिला, तेथें रात्रीस कामकंदलेचा अतिशय शोक करीत बसला आहे इतक्यांत विक्रमाची स्वारी आली त्याणें त्यास पाहिलें आणि पूसलें, हे ब्राह्मणा! तुला काय दुःख आहे तें सांग. रे मी विक्रमराजा, तुझें दुःख दूर करीन. तें ऐकून माधवानें सर्व वर्तमान सांगितलें; तेव्हां विक्रम ह्मण-

तो ब्राह्मणा! आधीं वेश्येशीं प्रीति करणें, मग तिचा विरह मानणें हा मोठा वेडेपणा आहे; रे ती धनाकरितांच पुरुषाला आपली प्रीति दाखविते माधव ह्मणाला राजा! तूं ह्मणतोस हें खरें आहे, पण ती तशी नव्हे, ती माझ्या गुणाची जाणती आहे, ह्मणून आह्मी उभयतां एकत्र असल्यावांचून फार दिवस वांचणार नाहीं. तें ऐकून विक्रमानें त्या ब्राह्मणास आपले घरीं आणिलें आणि सुंदर वेश्या गायनकलेंत निपुण अशा त्याचे पुढें उभ्या करून, त्यास ह्मणाला या स्त्रियांतून जी तुला पाहिजे ती घे. माधव बोलला राजा! कामकंदलेसारिखी कामकंदलाच; जर तिचा आणि माझा योग करशील तरच हा देह ठेवीन. तो त्याचा निश्चय पाहून दिनदयाळ राजा त्यास बरोबर घेऊन सर्व सैन्यासुद्धां देवनगरीजवळ गेला, आणि कामसेन राजास पत्र लिहिलें कीं, मी विक्रमराजा कामकंदले करितां येथें आलों आहे. तिला पाठऊन दे नाहीं तर युद्धास सिद्ध हो. कामसेनानें उत्तर लिहिलें कीं, मी कामकंदला देत नाहीं, युद्ध करायास सिद्ध आहे तेव्हां विक्रमान विचार केला कीं, आधीं कामकंदलेचे प्रीतीची परीक्षा पाहूं, नंतर युद्ध करूं. मग तो एकटाच तिच्या घराजवळ गेला आणि मी वैद्य आहें असें बोलला, तें ऐकून

दासींनीं त्यास माडीवर नेऊन कामकंदलेस दाखविलें, तेव्हां राजा तिचें नांव विचारून तिची परीक्षा करून बोलला, इला विरहाचें दुखणें आहे. तें ऐकून कामकंदला बोलली तर याचा उपाय तुजपाशीं नाहीं मग उगाच कां श्रम घेतोस? राजानें उत्तर केलें खरेंच;गोष्ट फसली, नाहीं तर तुला ज्याचा विरह आहे तो पुरुष आणून दिला असता, परंतु थोडेच दिवसांपूर्वीं, माधव तुझें नांव घेतां घेतां मरण पावला. ते शब्द कर्णीं पडतांच ती वेश्या माधवा! माधवा! असें ह्मणून प्राण सोडिती झाली. तें पाहून घरांतील सर्व मनुष्यें रडूं लागलीं. त्यांस विक्रम बोलला तुह्मी रडूं नका, इला मुर्च्छा आली आहे, औषध आणून मी आतां सावध करीन, असें बोलून राजा माधवाजवळ आला आणि त्यास कामकंदलेचें वर्तमान सांगितलें; तें ऐकतांच कामकंदले! कामकंदले! असें बोलून त्याणेंही प्राण सोडिला. तेव्हां विक्रम पश्चाताप पावून ह्मणतो, हाय हाय! दोघांची हत्या मला झाली, आतां हा दोष घेऊन माघारें जाण्यापेक्षां येथेंच मरावें हें बरें; असा निश्चय करून अग्नि पेटवून आंत उडी टाकूं लागला. तों वेताळ प्रगट होऊन ह्मणाला, राजा! प्राण देऊं नको, मी एक वस्तु देतो ही त्यांच्या मुखांत घाल ह्म-

णजे तीं जिवंत होतील. असें बोलून तो विक्रमास अमृतसंजीवनी औषधी देता झाला; ती घेऊन विक्रमानें तसें करितांच दोघेंही जिवंत झालीं नंतर कामसेनास जिंकिलें आणि कामकंदला माधवाचे स्वाधीन करून त्यास कामसेनाचे राज्यावर स्थापिला आणि आपण अवंतीस गेला. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. दुसरे दिवशीं आला तेव्हां एकविसावी पुतळी ' सौभाग्यमंजरी ' बोलली, हे भोजराजा! विक्रमासारिखें खरें खोटें पाहणें तुझ्यानें होईल तर या सिंहासनावर बैस. त्यानें पुसिलें कीं, विक्रमाचें तें कसें होतें तें सांग? तेव्हां 'सौभाग्यमंजरी' सांगत्ये.—

## कथा २१ वी.

एके दिवशीं विक्रमानें प्रधानास विचारिलें कीं, मनुष्यास बुद्धि येते ती त्याच्या पूर्वकर्मानें, किंवा माता, पिता, गुरु यांच्या शिकविण्यानें येते तें सांग? प्रधानानें उत्तर केलें हे महाराज! जर दुसऱ्याच्या शिकविण्यानें बुद्धि येती तर मूर्ख कोणीच न होते; सर्व लोक पंडितच होते. कारण, सर्व मनुष्यांस असें वाटतें कीं, आपणास सर्व विद्या याव्या आणि सुख व्हावें; परंतु हें कोणाचे स्वाधीन नाहीं ह्मणूनच किती

एक शहाणे व किती एक मूर्ख असे होतात. राजा बोलला, हें जर खरें आहे तर लोक मुलास विद्या शिकविण्याविषयीं श्रम कां घेतात? प्रधान ह्मणाला, पूर्व कर्माचेंच नांव दैव; तें प्रत्यक्ष येऊन मनुष्यास शिकवीत नाहीं, उद्योगद्वारा शिकवितें, यासाठीं उद्योग करावा; ह्मटलें आहे.—

उद्योगिनंपुरुषसिंहमुपैतिलक्ष्मीर्दैवंप्रधानमि
तिकापुरुषावदंति ॥ दैवंविहायकुरुपौरुषमा
त्मशक्त्यायत्नेकृतेयदिनसिद्ध्यतिकोऽत्रदोषः ॥ १

अर्थ—उद्योग करणारास फलप्राप्ति होते, दैवच मुख्य असें जे कोणी ह्मणतात ते शहाणे नव्हत, ह्मणून दैवावर भार न घालितां यत्न करावा; मग यत्न करूनही कार्यसिद्धि न झाल्यास आपणाकडे दोष नाहीं. असें दोघांचें बोलणें झाल्यानंतर मंत्री ह्मणाला, हे महाराज! या गोष्टीविषयीं आपणांस संशय असेल तर अनुभव घेऊन पाहिल्यानंतर निःसंशय होईल. तें ऐकून विक्रमानें अरण्यांत एक बंगला बांधविला, त्यांत बारा वर्षांचें साहित्य ठेवून आपला पुत्र, प्रधानाचा पुत्र, कोतवालाचा पुत्र आणि ब्राह्मणाचा पुत्र अशीं लहान लहान वयाचीं चार मुलें त्यांत ठेविलीं; त्यांच्या रक्षणाकरितां

मुख्या बायका ठेविल्या, आणि घरांभोंवताले रक्षक ठेवून त्या मुलांस मनुष्यांचा शब्दही ऐकूं येऊं नये असें केलें. त्यास सोन तीन वर्षें गेलीं, तेव्हां एके दिवशीं तेथें देवरूपी एक पुरुष प्रगट झाला; त्यानें सर्व रक्षकांस मोह घालून मुलांस बोलावयास शिकविलें आणि आपण अदृश्य झाला. मग बारा वर्षें झालीं तेव्हां विक्रमानें मुलांस आणविलें आणि प्रथम आपल्या पुत्रास विचारूं लागला, हे पुत्रा! तूं सुखी आहेसना? त्यानें उत्तर केलें, तुमच्या पुण्यानें सुखी आहें; नंतर प्रधानाच्या पुत्रास विचारिलें तो हात जोडून ह्मणाला आपले कृपेनें कुशल आहें. मग ब्राह्मणाच्या मुलास पुशिलें तो आशीर्वाद देऊन ह्मणाला, राजा! ईश्वरावांचून कोणी सुखी नाहीं; मनुष्यमात्रास कोणती तरी एखादी चिंता असते. शेवटीं कोतवालाच्या पुत्रास पुशिलें; तो प्रणाम करून बोलला, हे महाराज! लोक चोरी, चहाडी, लबाडी करितात त्यांस शिक्षा कशी होईल या काळजींत मी आहें अशीं चौघांचीं भाषणें ऐकून विक्रमानें विचारिलें, तुह्मांस बोलावयास कोणी शिकविलें तें सांगा: ते बोलले कोणी एक पुरुष आला होता त्यानें आह्मांस बोलायास शिकवून मी देव असें सांगून गुप्त झाला. तें श्रवण करून विक्रम प्रधानास ह्मणा-

ला तूं बोलत होतास तें खरें झालें. आतां माझा निश्चय झाला कीं, दैवच मुख्य कारण होय. शिक्षण इत्यादिक सर्व निमित्त मात्र आहेत. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं आला असतां 'लावण्यवती' बेविसावी पुतळी बोलली, हे भोजराजा! जो विक्रमासारिखा पुण्यवान त्यासच हें सिंहासन प्राप्त होईल. त्यानें विचारिलें विक्रम कसा पुण्यवान होता तें सांग ? मग 'लावण्यवती' सांगत्ये—

## कथा २२ वी.

विक्रमानें कोणी एक शंखचूडनामक दुष्ट राजा होता त्यास मारून त्याचें राज्य घेतलें, तेव्हां जुने कारभारी घरीं बसवून नवे ठेवले आणि आपण तेथें कांहीं दिवस राहिला असतां, एके दिवशीं शंखचुडाचा प्रधान नदींत स्नान करीत होता, तों वरून एक सुंदर फूल वाहत आलें, तें घेऊन तो घरीं आला आणि मनांत ह्मणतो हें फूल बहुतकरून इंद्राचे वनांतलें असेल. याचे सुगंधास आणि चांगुलपणास या लोकीं उपमाच नाहीं; तर अशी ही अप्रतिम वस्तु विक्रमास दिली असतां तो प्रसन्न होऊन आपणास कांहीं कामकाज सांगेल असें मनांत आणून तें फूल त्यानें राजास नेऊन दि-

ळें. तें पाहतांच विक्रमास पूर्वजन्माची आठवण झाली, तेव्हां त्या प्रधानास बोलतो कीं, ह्या फुलाचा वृक्ष आणून देशील तर मी तुला जें पाहिजे तें देईन आणि न आणिलास तर तुझें सर्वस्व घेऊन तुला गांवाबाहेर घालवून देईन. तें ऐकून तो प्रधान घरीं आला आणि चिंता करितो आहे कीं, ईश्वरानें मजवर मोठें संकट आणिलें आतां वृक्ष आणायास न गेलों तर राजा सर्वस्व हरील, गेलों तर तो सांपडल्यास बरें, न सांपडल्यास देशांतरीं रहावें लागेल. असो; परंतु न जाऊन परिणाम नाहीं. मग तो प्रधान एके नांवेंत बसून त्या नदीचे ओघासमोर चालिला. जातांजातां बहुत दूर गेला, तों मोठें एक अरण्य लागलें त्यांतील सिंह, वाघ आदिकरून पशु नदीतीरीं पाणी पीत होते त्यांस पाहून भयभीत झाला. इतक्यांत अकस्मात् वरून तसलेंच एक फूल वाहत आलें, तें पाहून थोडासा त्यास भरंवसा आला. पुढें जातो आहे तों असें दृष्टीस पडलें कीं, त्या नदीचे तीरावरून एक मोठें झाड झळंबत आहे व त्याचे खांदीवर एक मांसाचा पिंड आहे त्यापासून रक्ताचा एक एक थेंब उदकांत पडतो, व त्याचें फूल होऊन वाहत जातें; असें पाहून तो नावेंतून उतरला आणि तीरीं येऊन न्याहळूं लागला, तों

त्या झाडाचे वरचे आंगीं दुसरे तसेच पिंड दृष्टीस पडलें, परंतु त्या पिंडांपासून रक्ताचे थेंब पडत नव्हते; याप्रमाणें पाहून तो प्रधान पुनः नावेंत बसून आपले नगरास आला आणि त्यानें तें वर्तमान विक्रमास सांगितलें; तें ऐकून विक्रम बोलला, ज्यां पिंडापासून फुलें उत्पन्न होतात तो माझा देह आहे, आणि दुसरे पिंड पाहिलेस ते माझे बरोबर जे राज्यकारभार करिताहेत त्यांचे देह होत. पूर्वीं मी असें उग्र तप केलें ह्मणून मला राज्य प्राप्त झालें आणि माझ्या बरोबरच्यांनींहीं तसेंच तप केलें ह्मणून ते आज वैभव भोगीत आहेत. जो प्राणी जसें कर्म करितो त्यासारिखें त्यास फळ प्राप्त होतें; याचा प्रत्यय दाखवायाकरितां तुला मी तेथें पाठविलें. असें बोलून विक्रमानें त्या प्रधानास मोठें राज्यकाम सांगून संतुष्ट केला. अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. दुसरे दिवशीं आला असतां 'करुणावती' तेविसावी पुतळी बोलली, हे भोजराजा! आतां मी एक विक्रमाची गोष्ट सांगत्यें ती ऐक.—

## कथा २३ वी.

एके दिवशीं विक्रमराजा सभेंत आला असतां सुतारानें बहुत सुंदर एक लांकडाचा घोडा आणिला आणि राजास ह्मणाला

हे महाराज! हा घोडा घेऊन माझें कसब पहावें. विक्रमानें त्यास विचारिलें कीं, यांत कोणता गुण आहे? सुतार बोलला याजवर बसून कळ दाबिली ह्मणजे हा जिकडे पाहिजे तिकडे मनुष्यास अतित्वरेनें नेतो, हा याजमध्यें गुण आहे. राजा ह्मणाला, तर यास फिरवून दाखीव? तेव्हां तो सुतार वर बसून अनेकप्रकारच्या चाली राजास दाखवून शेवटीं त्यास धांववूं लागला; तेव्हां त्याजवर दृष्टिही ठरेनाशी झाली. असा त्याचा गुण पाहून विक्रमानें तो घोडा घेतला आणि सुतारास एक लाख रुपये दिले. तेव्हां तो बहुत संतुष्ट होऊन ह्मणाला, राजा! ह्या घोड्यास फिरवितेवेळेस टांच लावूं नये. जर कां ती लाविली तर मग हा कोणासही आटोपणार नाहीं; ह्मणून एवढ्या गोष्टीचें मात्र पक्कें स्मरण ठेवावें. नंतर तो घोडा राजानें आपले पागेंत ठेविला; त्यास कांहीं दिवस गेल्यानंतर एके दिवशीं विक्रम अश्वशाळेंत गेला' आणि जवळ सरदार होते त्यांस ह्मणतो, अहो याजवर तुह्मांस बसतां येईल? त्यांनीं उत्तर केलें; याजवर बसून याला फिरविणें हे कर्म सामान्याचें नव्हे; तेव्हां राजा 'मी बसतों' असें ह्मणून त्याजवर बसला आणि त्यास फिरवूं लागला असतां विसरून त्यानें त्यास टांच मारिली. मग तो

उडून आकाशमार्गानें जाऊं लागला, तें पाहून सर्व लोक हाःहाःकार करूं लागले; मग तो घोडा मोठ्या एका अरण्यांत जाऊन एका वृक्षास अडकला, तेव्हां विक्रम झाडाखालीं उतरून त्या अरण्यांत चहूंकडे फिरूं लागला; तों एका झाडाजवळ दोन विहिरी आणि एक बंगला आहे असें पाहून तेथें जवळ गेला, तों त्या बंगल्यांत पलंगादिक सर्व साहित्य ठेविलें आहे आणि एक वानरी बसली आहे, असें पाहिलें, आणि चित्तांत ह्मणतो; येथें कोणी लपून राहिलें आहे काय? किंवा कोणी कांहीं कारणास्तव हें साहित्य आणिलें असेल काय? मग तो त्याचा शोध लागावा ह्मणून झाडावर बसला, इतक्यांत तेथें एक जती येऊन त्यानें डाव्या हातच्या विहिरींतलें पाणी काढिलें आणि त्या वानरीचे अंगावर शिंपिलें; तेव्हां ती स्त्री होऊन त्या जतीबरोबर विलास करूं लागली; नंतर त्यानें जातेसमयीं उजव्या हातच्या विहिरींतलें पाणी तिच्यावर शिंपून पुनः तीस वानरी केली आणि आपण निघून गेला. तें आश्चर्य पाहून विक्रम झाडाखालीं उतरला, आणि त्यानें त्या विहिरींतलें पाणी काढून वानरीचे आंगावर टाकिलें, तेव्हां ती स्त्री होऊन बोलली; हे उदारा! मला या दुःखापासून सोडीव. विक्रम ह्मणाला तूं

येथें कशी आलीस? ती बोलली, मी लहानपणीं न कळतां आईबापांची कांहीं अमर्यादा केली ह्मणून त्यांनीं मला या जतीच्या स्वाधीन केलें, हा दुष्ट माझे फार हाल करितो, असें तिचें भाषण ऐकून विक्रमास तिची दया आली, आणि त्यानें वीराचें स्मरण केलें, तेव्हां तीन वीर त्याचे समोर येऊन उभे राहिले. मग विक्रमानें एकाच्या खांद्यावर त्या स्त्रीस बसवून आपण एकावर बसला आणि एकाकरवीं तो लांकडाचा घोडा घेऊन अवंतीस येता झाला; अशी कथा ऐकून भोजराजा माघारां गेला. दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ गेला तों 'हंसगमना' चोविसावी पुतळी बोलती झाली राजा ऐक.—

## कथा २४ वी.

एके दिवशीं अवंतींत कोणे एका स्त्रीनें एका सावकाराच्या पुत्रास आज रात्रीं माझ्या घरीं ये ह्मणून खूण केली; तें विक्रमानें पाहिलें आणि मनांत ह्मणतो, हर! हर! माझ्या राज्यांत असा अधर्म घडूं नये, मी याचें निवारण करावें; ह्मटलें आहे.—'राज्यांत अधर्म होतो तो समजला असतां जो राजा त्याचें निवारण करीत नाहीं तो त्या पातकाचा कर-

ता होतो, असें मनांत आणून रात्रीं राजा तिच्या घराजवळ गेला, आणि खिडकींतून बारीक खडे मारूं लागला, तेव्हां ती समजली कीं, आपण ज्यास दिवसां बोलाविलें तो आपली खूण समजून आला आहे, तर अशा चतुराबरोबर देशांतरीं जाऊन यथेच्छ सुख भोगावें. असा निश्चय करून ती रत्नभूषणांची पेटी घेऊन त्याच्याजवळ आली आणि बोलली, सख्या! चल आपण दोघे देशांतरीं जाऊं आणि सुखानें राहूं, राजा बरें ह्मणाला आणि तिला घेऊन चालिला; तो नदी उतरून एका रानांत गेला, तेथें एका झाडाखालीं उभयतां बसलीं; मग राजा ह्मणतो मध्ये! हें कर्म तूं वाइट केलेंस. या व्यभिचारकर्मांत परलोकीं तर सुख नाहींच; या लोकीं आहे ह्मणावें तर तेंही नाहीं, जो लबाड, ठक, कृत्रिमि, घातकी आणि गरजू असतो तोच पुरुष जारकर्मास झटतो; तर अशाच्या संगतींत सुख कोठचें? व्यभिचारकर्मास राजाचें भय, स्वजनांचें भय, ज्ञातीचें भय, असें हें कर्म मोठें निंद्य होय; ह्मणून यांत कांहीं सुख नाहीं. पहा बरें! जर मी तुला येथें या तरवारीनें हाणून हें तुझें द्रव्य घेऊन गेलों तर तूं काय करिशील? असें राजाचें भाषण ऐकून तिची व्यभिचारबुद्धि मेली, आणि ती राजास नमस्कार

करून बोलली कीं, तूं धन्य आहेस. मी नरकांत पडत होत्यें त्यांतून मला तूं आज राखिलेंस; तर आतां मला तूं घरीं नेऊन पोंहचीव. अतःपर मी असें कर्म करणार नाहीं. नंतर राजानें तिला तिचे घरीं पोंचविलें आणि आपण घरीं येता झाला. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. दुसरे दिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां 'रूपकांता' पंचविसावी पुतळी बोलली, राजा! मी एक विक्रमाची कथा सांगत्ये ती ऐक.–

## कथा २९ वी.

एके दिवशीं विक्रमराजा आपले रंगमहालांत गायन ऐकत असतां शिवपूजेचा वेळ टळला, तेव्हां पश्चात्ताप पावून ह्मणतो. हर! हर! मला धिःकार असो; कीं, मी विलासांत गुंतून आज एवढे वर्षांचें व्रत सोडिलें. मी विषयांत पडून मोठें मूर्खपण केलें, तर मी आतां तप करून शिवाची कृपा संपादीन. असा निश्चय करून त्यानें प्रधानाचे स्वाधीन राज्य केलें आणि तत्क्षणींच आपण नर्मदातीरीं एका अरण्यांत तप करावयास गेला. तेथें अनेक तपस्वी तप करीत होते. कोणी पंचाग्निसाधक, कोणी धूम्रपानी, कोणी ऊर्ध्वबाहु, पर्णाशनी, वायुभक्षक, ध्यानी, पूजक, वेदांतविचारी चांद्रा-

यणादिक व्रतकर्ते, योगाभ्यास करणारे व कोणी आपलें शरीराचा होम करणारे असत; तेथें विक्रमानें तीस वर्षे तप केलें. तेव्हां 'महादेव' प्रसन्न होऊन वर माग ह्मणाला. विक्रम साष्टांग नमस्कार करून बोलला, हे देवा! मला आपल्या चरणाजवळ ठेवा आणि जे येथें तुझ्या दर्शनाकरितां आज बहुत वर्षे तप करीत आहेत, आणि जे करितां करितां मरण पावले त्या सर्वांस कृपा करून भेट द्यावी, एवढें मागतों. असें विक्रमाचें भाषण ऐकून ईश्वरानें आपल्या गणास आज्ञा केली कीं, जे तपस्वी मरण पावले आहेत त्यानां जीवंत कर; ते ऐकून तो गण तपस्व्यांच्या अस्थींवर अमृत शिंपिता झाला. तेसमयीं एक एक तपस्वी जीवंत होऊन शिव! शिव! हर! हर! असा जप करीत आनंदानें नाचूं लागले. मग त्या सर्वांस महादेवानें दर्शन दिलें आणि विक्रमास एक कमळाचें फूल देऊन सांगितलें कीं, हें कमळ जेव्हां कोमेल तेव्हां तूं समज कीं, आतां आपलें आयुष्य सहा महिने राहिलें आहे; मग तूं माझ्याजवळ ये; आतां तूं जाऊन आपलें राज्य कर; असें सांगून महादेव गुप्त झाला. नंतर विक्रम त्याच आज्ञेस्तव उज्जयनीस आला आणि पुनः राज्य करूं लागला. ही कथा सांगून 'रूपकांता' ह्मणाली, ज्या

ला महादेवानें राज्य कर अशी आज्ञा केली अशाचे आसनावर बसणारा असा समर्थ कोण आहे? तें ऐकून भोजराजा माघारा गेला. दुसरे दिवशीं आला असतां 'देवनंदा' सविसावी पुतळी बोलली हे राजा तुला सर्वांनीं कथा सांगितल्या आतां मीही सांगत्यें ऐक.—

## कथा २६ वी.

कोणेएके दिवशीं विक्रम राजा आपल्या प्रधानांस नीति सांगता झाला. रे प्रधानहो! ऐका—ज्ञानावांचून लटकेंच वैराग्य दाखवूं नये; मित्रास दुखवूं नये; अपराधावांचून कोणावर रागें भरूं नये; कोणास वाईट बोलूं नये; दुर्जनाची संगत करूं नये; मोठ्या अन्यायाशिवाय स्वस्त्रीस टाकूं नये, स्त्रियांवर विश्वास ठेऊन त्यांस गुह्य गोष्ट सांगूं नये; कोणी भविष्य सांगेल त्याची काळजी वाहूं नये; लक्ष्मी स्थीर राहील असा भरंवसा धरूं नये; चोरास ओळख देऊं नये; वाउगें भापण करूं नये; दानपुण्यावांचून सुना दिवस जाऊं देऊं नये; ईश्वराचें भजन निरंतर करावें, आईबापांचा उपदेश ऐकावा, नीचांची संगत धरूं नये; खोटी साक्ष देऊं नये, मोठ्याही लाभाकरितां पापकर्म करूं नये; देश काळ वर्तमान जाणून जें क-

रणें तें करावें; कोणाच्या लाभास आड येऊं नये; थट्टा करूं नये; सर्वांशीं मिळून असावें; बहुतांचे मतास येईल तें करावें; अडल्याचें साहित्य करावें; दुसऱ्याच्या भाग्याची अदेखाई न करावी; यौवन, धन आणि आयुष्य हीं चंचळ जाणावीं; एकट्यानें देशांतरीं जाऊं नये; आपल्या सामर्थ्याप्रमाणें धर्म करावा; पुत्राचे फार लाड करूं नये; ज्याला देऊं केलें त्याला सत्वर द्यावें; कायावाचामनानें नित्य परोपकार करावा; मर्म कोणाचें काढूं नये; कोणाचें गुह्य उघडें करूं नये; सत्कर्मास द्रव्य खरचलें तें व्यर्थ गेलें असें मानूं नये; नास्तिकपणा धरूं नये; आपले योग्यतेप्रमाणें इच्छा करावी; प्रशंसेस भुलूं नये; अंतःकरण स्वस्थ ठेवावें; विपत्ति निष्फळ सांगूं नये; द्यूतकर्म करूं नये; दुसऱ्याचें वित्त हरण करूं नये; परस्त्रीवर इच्छा करूं नये; प्राप्तीपेक्षां खर्च कमी करावा; ऋण काढून सण करूं नये; आपल्या पराक्रमानें पोट भरावें; विद्येविषयीं तृप्त होऊं नये; आशा मारावी; काम जिंकावा; क्रोध आवरावा; मत्सर सोडावा; मद जिंकावा; मोह खंडावा; मृत्यूची आठवण नित्य ठेवावी; मनांत ईश्वराचें भय वागवावें; प्राणिमात्रावर दया करावी; संपत्तींत पूर्व स्थिति विसरूं नये; विपत्तींत धैर्य सोडूं नये; चुकी पदरीं घ्यावी; दुसऱ्याचा गुण घ्यावा; थोरांच्या

कल्याणाचे कामांत पुढें सरावें; ज्यांत आपला नाश आहे तें कर्म इंद्रियांस आवडतें ह्मणून करूं नये; देह सोडिल्यावर मागें कीर्ति राहिल असें कर्म करावें; नम्र आणि मधुर असें भाषण करावें; दुसऱ्यास बरा मार्ग दाखवावा; याप्रमाणें 'देवनंदेचें' मुखांतून विक्रमाची नीति ऐकून भोजराजा माघारा गेला, दुसरेदिवशीं सिंहासनाजवळ आला तेव्हां 'देवांगना' सत्ताविसावी पुतळी कथा सांगत्ये.—

## कथा २७ वी.

राजाविक्रम राज्य करीत असतां एके दिवशीं एक सिद्धांती जोशी आला व त्यानें राजास सांगितलें कीं, मी भूत, भविष्य, वर्तमान हीं सर्व जाणतों. त्यास राजानें पुसिलें; या वर्षांत प्रजेस पर्जन्यसुख कसें आहे? जोशी ह्मणाला, महाराज! यंदा रविमध्ययोग आहे याकरितां पर्जन्य पडणार नाहीं. यास प्रमाण.—

बुधशुक्रौसमीपस्थौकुर्वतःसजलांमहीम् ॥
तयोरंतर्गतोभानुःसमुद्रमपिशोषयेत् ॥ १ ॥

अर्थ—बुध आणि शुक्र हे दोघे जवळ असले तर वृष्टि पुष्कळ होते आणि त्यांच्यामध्यें सूर्य असला तर पर्जन्य पड-

त नाहीं; तेव्हां विक्रमानें थोर थोर ब्राह्मणांस बोलावून विचारिलें, कीं पर्जन्य पडावयास काय उपाय करावा? ते ह्मणाले वाजपेय यज्ञ करावा. मग विक्रमानें यज्ञास आरंभ केला, त्या यज्ञसमारंभामध्यें जे जे याचक आले त्यांचा त्यानें यथायोग्य सत्कार केला. यज्ञसमाप्तीचें वेळेस इंद्रादिक देव प्रत्यक्ष येऊन विक्रमास बोलले कीं, राजा! आह्मी प्रसन्न झालों वर माग. विक्रम ह्मणला, आजपासून कधींही माझ्या देशांत अवर्षण होऊं नये. तें मान्य करून देव आपापल्या स्थानास गेले. मग विक्रमानें कोट्यावधि ब्राह्मणांस व इतर याचकांस मिष्टान्न भोजन घातलें आणि दक्षिणा देऊन संतुष्ट केलें त्या दिवसापासून पुढें मालवदेशांत कधींही अवर्षण पडलें नाहीं. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. दुसरे दिवशीं आला तेव्हां 'चित्रिणी' अठ्ठाविसावी पुतळी बोलली, हे भोजराजा! मीही तुला एक विक्रमाची कथा सांगत्यें ती ऐक आणि मग या सिंहासनावर बैस.

## कथा २८ वी.

एके समयीं विक्रमराजा अरण्यांत शिकारीस गेला होता तेथें यम आणि वरुण हे दोघे देव त्याचें सत्व पाहावयास आले. यम वाघाचें रूप धरून पाठीमागें लागला, आणि

वरुण रोडक्या गाईचें रूप धरून भयानें घाबऱ्याघाबऱ्या धांवत आला आणि ह्मणाला राजा! मी तुला शरण आल्यें, मला राख. तें ऐकून विक्रमास दया आली मग तरवार घेऊन त्या गाईभोंवता तो फिरूं लागला; वाघ राहून राहून गाईवर झडपा मारीत आहे; अशा संधींत मोठा पाऊस येऊन बहुत चिखल झाला; त्यांत ती गाय बसली, तेव्हां वाघ भूमीवर पुच्छ आपटून मोठा भयंकर शब्द करीत घटकेघटकेस चव-ताळून तिजवर येत असे. याप्रमाणें राजानें पावसांत उभें रा-हून सर्व रात्र काढिली. प्रातःकाळ होतांच यम आणि वरुण दोघेही देव प्रगट होऊन बोलले, राजा आह्मी देव तुझें सत्व पाहावयास आलों होतों, तरी तें पाहून प्रसन्न झालों: आतां तुझ्या इच्छेस येईल तो वर माग. राजा ह्मणाला तुमच्या प्र-सादानें मला सर्व आहे,कांहीं उणें नाहीं. आतां हें मागतों कीं, आपली कृपा असावी. तें ऐकून त्यांनीं स्वर्गींची कामधेनु दि-ली, ती घेऊन राजा उज्जयनीस येत असतां मार्गीं एका दरि-द्री ब्राह्मणानें ती मागितली, तेव्हां विक्रमराजा त्यास ती दे-ता झाला. अशी कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. दुस-रे दिवशीं आला तेव्हां 'सुलोचना' एकुणतीसावी पुतळी ह्मणा-ली हे भोजराजा! मीही एक कथा सांगतें ती ऐक.--

# कथा २९ वी.

एके दिवशीं विक्रमराजा उज्जयिनींत चोरबातमीस रात्रीं फीरत असतां एका दरिद्री ब्राह्मणाच्या घराजवळ आला, तो ब्राह्मण आणि त्याची स्त्री उभयतां कांहीं बोलत होतीं, तें ऐकावें ह्मणून बाहेर उभा राहिला, तेसमयीं स्त्री पतीस ह्मणते 'स्वामी! आपण दरिद्रामुळें फार दुःख पावतों, तर विक्रमराजाजवळ याचनेस कां जानां!' ब्राह्मण सांगतो, अगे! सध्यां आपणास काळ प्रतिकूळ आहे, माझी विपत्ति राजाच्यानेंही दूर होणार नाहीं. तें ऐकून विक्रम आपल्या घरास गेला. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं त्या ब्राह्मणास बोलावून आणिलें आणि कोहळ्यांत गुप्त रत्नें भरून तें त्यास दान दिलें, तें न समजतां ब्राह्मणानें एका सराफास विकलें आणि पैसे घेऊन घरास आला. पुनः त्या रात्रीस राजा ब्राह्मणाचे घराजवळ आला आणि ऐकतो आहे, तों ब्राह्मण स्त्रीस ह्मणतो पाहिलासना चमत्कार कीं, जो राजा याचकास लाखो रुपये देतो, त्यानें मला मुजरत बोलवून एकच कोहळें दिलें, तें बाजारांत एका चवलास गेलें, हा शब्द माझ्या प्रारब्धाकडे राजाकडे नाहीं. तें ऐकून विक्रम खिन्न झाला आणि मनांत ह्मणतो, हा काळ यास प्रतिकूळ

आहे खरा, यास आपली द्रव्य देऊन तरी काय फळ! तर आतां काय करावें व कसें केल्यानें हा सुखी होईल! अशी चिंता करितो आहे, तों तेथें एक पुरुष आला आणि ब्राह्मणाचे घरांत जाऊं लागला. त्यास राजानें विचारिलें, तूं कोण आहेस? आणि एवढ्या रात्रीस या घरांत जाण्याचें तुझें काय काम आहे ते सांग. त्यानें उत्तर केलें, ज्यास काळ ह्मणतात तो मी; ह्या ब्राह्मणास छळायास जातों आहे. राजा नमस्कार करून बोलला, देवा! माझी एवढी प्रार्थना ऐक कीं, तूं याचे वांट्याचें मला छळ आणि यास सुख दे. काळ बोलला; बरें तर एक वर्षपर्यंत तुला मी पीडीन, असें बोलून गुप्त झाला. राजा आपले घरीं येऊन निजला ब्राह्मणासही झोंप लागली. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं सराफानें कोहळें चिरलें तों आंत रत्नें निघालीं. तीं पाहून सराफ समजला आणि ह्मणतो, हें राजानें त्या ब्राह्मणास गुप्त दान दिलेलें आहे. हरहर! हें ब्राह्मणाचें द्रव्य कोणीं घ्यावें? ह्मटलें आहे, दुसऱ्यानें न कबूल दिलेली किंवा मार्गावर पडलेली दुसऱ्याची वस्तु घेणें हें चौर्यकर्म होय. मग तो तीं रत्नभरित कोहळ्याचीं दोन अर्धें घेऊन ब्राह्मणाचे घरीं आला, आणि नमस्कार करून बोलला; भटजीबोवा, आपणास राजानें गु-

प्रदान दिलें होतें, तें आपलें सांभाळावें. तें पाहून ब्राह्मणास बहुत हर्ष झाला आणि स्त्रीसहित आनंदानें प्रपंच करूं लागला. इकडे त्याच रात्रीस राजाच्या भांडारशाळेंत चोरी झाली, तिची प्रातःकाळीं चौकशी करताहेत तों कोठीं, महाल, पागा व राजवाडा यांस एकदांच आग लागली, आणि सर्व जळालें. तेव्हां विक्रमराजा प्रधानास रात्रीचें सर्व वर्तमान सांगून आपण सेतुबंध रामेश्वरास गेला. तेथें देवळांत तप करित होता तों, एके दिवशीं चंदीचंदावरचा राजा देवाचे यात्रेस आला. तो विक्रमाचें अत्यंत सुंदर रूप पाहून परम आनंद पावला, आणि बोलतो, हे महा पुरूषा! तुला पाहून मी फार समाधान पावलों. मी इच्छितों कीं, तूं माझ्याजवळ सदा असावेंस. विक्रम बरें ह्मणाला; मग तो राजा विक्रमास आपले पट्टणास घेऊन गेला. तेथें एके दिवशीं असें झालें कीं, राजाची स्त्री विक्रमासी गोष्ट सांगत बसली आहे, तों तीची न्हाण्याची वेळ झाली तेव्हां ती गळ्यांतील नवरत्नांचा हार समोरच्या खुंटीवर ठेऊन बोलली, हे गुरुजी! मी न्हाऊन येईपर्यंत आपण हा हार पहावा, असें बोलून ती गेली. विक्रम हाराकडे पहात बसला आहे त्यावेळीं काळानें त्या खुंटींत प्रवेश करून हार गिळिला. तें पाहून विक्रम विचा-

र करितो कीं, हें अघटित कर्म घडलें हें जर लोकांस सांगावें तर खरें वाटणार नाहीं; परंतु आपण सांगावें, जें होणार तें होवो, असत्य भाषण सर्वथा करूं नये, असा निश्चय करून तसाच बसला आहे इतक्यांत राजपत्नी येऊन पुसूं लागली कीं, येथील हार काय झाला? त्यानें झालेलें वर्तमान सांगितलें. ती ह्मणाली तुह्मी माझी मस्करी करितां. विक्रम उगाच राहिला. तिनें तें वर्तमान आपल्या पतीस सांगितलें. राजा येऊन विक्रमास एकांतीं पुसूं लागला कीं, हार काय झाला तें सांग. त्यानें झालेलें वर्तमान सांगितलें; तें खरें न वाटून राजास फार क्रोध आला आणि त्याचे हातपाय तोडविता झाला. विक्रमराजा त्या दुःखानें फार व्याकुळ झाला आणि रस्त्यांत पडला आहे; तों तेथें एक तेली आला, त्यास दया येऊन विक्रमास त्यानें आपले घरीं नेलें, आणि औषध लावून बरें केलें; मग ह्मणाला थोंत्या! तूं माझे घाण्यावर बसून बैल हाकीत जा. तें ऐकून विक्रम ह्मणाला, तुझ्या घरांत जितक्या तेलाच्या घागरी असतील तितक्या मी मंत्रानें भरून ठेवितों; त्यांतून तूं कितीही काढिलेंस तरी उणें होणार नाहीं, मग घाण्याचें काय काम! असें बोलून विक्रमानें तसें केलें, तेव्हां हजारो रुपयां-

ची नित्य विक्री होऊं लागली. नंतर तो तेली मोटा एक बंगला बांधून त्यांत त्या थोंट्यास ठेविता झाला. तेथें जवळच राजकन्येचा वाडा होता एके दिवशीं सांजवेळेस विक्रमराजा गायन करीत असतां दीपराग आलापूं लागला, तेणेंकरून राजकन्येच्या मंदिरांतील दिवे विझाले होते ते पुनः लागले. तिनें तो शोध करून आपल्या पित्यास सांगितलें कीं, जो पुरुष दीपराग ह्मणून दीप लावील त्यास मी पति करीन, असा माझा निश्चय झाला, ह्मणून तेल्याच्या पुत्रास मी नवरा करित्यें. तें ऐकून मातापितरांनीं बहुत निषेध केला, तथापि तिनें तोच थोंटा पति केला. एके समयीं एकांतीं राजकन्येनें थोंट्यास पुसिलें कीं, तूं कोठचा कोण आहेस? त्यानें झालेलें सर्व सांगितलें, तें ऐकून ती, विक्रम माझा पति अशा संतोषानें त्याची बहुत सेवा करूं लागली. तेथें एके दिवशीं असें झालें कीं, त्या चंदीचंदावरच्या राजाकडे विलासपुरीचे राजानें तीन सोन्याच्या पुतळ्या वजनांत व आकृतींत एकसारख्या अशा पाठवून विचारिलें कीं, यांत उत्तम मध्यम व कनिष्ठ कोणती ती सांगावी. राजानें चार चतुर लोक बोलावून परिक्षा केली; परंतु कोणासही त्यांत उणें अधिक आढळेना. राजा चिंतेंत पडला आहे, इतक्यांत तेथें

लक्ष्मी, बुद्धि, सत्य, आणि काळ हीं चौघेंजणें आलीं, आणि बोललीं, राजा ! आह्मांत कोण थोर तें सांग. राजानें विचार केला, परंतु चौघेंही थोरच दिसून आलीं, लहान मोटें कांहीं कळेना तेव्हां तो फार चिंतेंत पडला, तें वर्तमान राजकन्येनें थोंट्यास सांगितलें. थोंटा ह्मणाला, माझे संकटकाळाचे दिवस तीन उरले आहेत, ते सरले ह्मणजे मी निवाडा करीन. नंतर चौथेदिवशीं राजानें थोंट्यास बोलावून आणिलें. तो ह्मणाला, मागें मी जेथें वसलों असतां खुंटीनें हार गिळिला आहे तेथें वैठक करावी. प्रधानानें तसें केलें. नंतर थोंट्यानें त्या तीन पुतळ्या आणवून फार वेळ परीक्षा केली, परंतु त्यांत कांहींच अधिक उणें दिसेना. तेव्हां तिघींच्या कानांत काडी घालविली. तों एकीची तोंडांतून बाहेर निघाली, दुसरीची दुसऱ्या कानांतून निघाली, तिसरीची पोटांत गेली, असें पाहून त्यानें राजास सांगितलें कीं, जिच्या तोंडांतून बाहेर काडी निघाली, ती पुतळी कनिष्ठ होय. कीं, तिला कांहीं गोष्ट सांगितली तर ती दुसऱ्याजवळ सांगेल; जिच्या कानांतून निघाली ती मध्यम. कीं, ती एका कानानें गोष्ट ऐकून दुसऱ्या कानानें सोडील मनांत धरणार नाहीं. जिच्या पोटांत काडी राहिली ती उत्तम. कीं, तिला

कोणी कांहीं गोष्ट सांगितली तर ती मनांत ठेवील, कोणाशीं बोलणार नाहीं. तें विक्रमाचें चातुर्य पाहून सर्वांस आनंद झाला. नंतर लक्ष्मी पुढें होऊन बोलली कीं, सर्वांपेक्षां मी थोर आहें. तीस विक्रमानें विचारिलें कीं, जर तूं थोर तर विक्रमास काळ प्रतिकूळ झाला ते समयीं तुझें कांहींच कां चाललें नाहीं? ती निरुत्तर झाली. मग बुद्धि ह्मणाली मी थोर, त्यानें तिलाही तसेंच विचारिलें, तें ऐकून तीही उगीच बसली, मग धर्म बोलला सर्वांपेक्षां मी मोठा, त्यासही त्यानें तसेंच पुसतां तोही निरुत्तर झाला, मग मूर्तिमंत काळ येऊन उभा राहिला, त्यास पहातांच थौंघ्यानें नमस्कार केला. इतक्यांत खुंटींत हार गेला होता तो बाहेर आला; तेव्हां थोंटा काळास ह्मणतो तूं प्रतिकूळ असतां कोणाचाही उपाय चालत नाहीं. ह्मणून तूंच थोर. लक्ष्मी, बुद्धि व धर्म हीं तूं अनुकूळ आहेस तर सुख देऊं शकतात, तुजवांचून यांस सामर्थ्य नाहीं असें त्याचें भाषण ऐकून काळ संतुष्ट झाला, आणि विक्रमास हातानें कुरवाळिता झाला. तेणेंकरून त्यास हात पाय फुटले आणि शरीर पूर्ववत् झालें, तें पाहून सर्वांस परम आनंद झाला, आणि ते आपापल्या स्थानांस गेले. मग विक्रम राजा त्या तेल्यास तेथील अर्धराज्य देऊन

स्त्रीसहित आपण उज्जयनीस आला. ही कथा ऐकून भोज राजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं आला, तेव्हां 'प्रेमावती' तिसावी पुतळी बोलली राजा! आतां मी एक कथा सांगत्यें ती ऐक.—

## कथा ३० वी.

विक्रमराजा राज्य करीत असतां कपिलाषष्ठीचें पर्व आलें, ते दिवशीं राजा गंगास्नानास गेला, तेथें विद्वान् तपोनिधि असे ब्राह्मण व गरीब दुबळेही बहुत मिळाले होते; त्यांस पाहून राजाच्या मनांत आलें कीं, असें पर्व पुढें येईल, मग मी धर्म करीन असा भरंवसा धरू नये. आयुष्यादिक सर्व चंचळ आहेत, यास वचन.—

अस्थिरंजीवितंलोकेअस्थिरेधनयौवने ॥
अस्थिराःपुत्रदाराश्चधर्मःकीर्तिर्द्वयंस्थिरं ॥१॥

अर्थ—मृत्युलोकीं आयुष्य अशाश्वत आहे, तशींच धन, तारुण्य, पुत्र, स्त्रिया, हींही क्षणिक होत; धर्म आणि कीर्ति हीं दोनच शाश्वत आहेत; तर जें शाश्वत तें संपादावें, असा निश्चय करून त्यानें ब्राह्मणांस अनेक प्रकारचीं दानें दिलीं. व इतर याचकांसही बहुत धन दिलें. सर्वांस अन्नदा-

न केलें, आणि आपण भोजन करून बसला आहे, इतक्यां-
त तेथें एक गारुडी आला तो ह्मणाला, महाराज! मी खेळ
करीतों तो अवकाशें करून पहावा. असें बोलून तो साहि-
त्य आणावयास ह्मणून गेला तों एक शिपाई घोड्यावर ब-
सून स्त्रिसहित तेथें आला; आणि राजास रामराम करून
उभा राहिला; त्यास प्रधानानें पुशिलें, तूं कोण व कोठून
आलास! तो ह्मणाला मी इंद्राचा दूत, मला इंद्रानें कांहीं
कारणास्तव शापिलें ह्मणून मी मृत्युलोकीं राहात असतों;
माझी कांहीं विनंति आहे ती ऐकावी. आज देवादैत्यांशीं
युद्धप्रसंग होणार, त्याकरितां मला इंद्रानें स्वर्गीं बोलावि-
लें आहे; ही माझी स्त्री सकुमार व लहान आहे हिला युद्धांत
नेतां येत नाहीं, व हिला भलत्याजवळ ठेवुनही जाववत ना-
हीं, अशा अडचणींत मी पडलों ह्मणून मी येथें आलों आ-
हें. विक्रमराजास परस्त्री कन्येसारखी आहे, अशी कीर्ति ऐ-
कून मी येथें येऊन असें इच्छितों कीं, तुजपाशीं ही स्त्री ठे-
वून स्वर्गास जावें. तेथून येई तोंपर्यंत माझ्या स्त्रीचा सांभाळ
त्वां करावा. राजा बरें ह्मणाला. नंतर तो शिपाई राजाजव-
ळ स्त्रीस ठेवून आकाशांत उडून गेला, त्यास अर्धघटिका
झाली नाहीं तों अकस्मात् मोठा शब्द होऊन आकाशांतून

एक भुज भूमीवर पडला, तो पाहून ती स्त्री राजास ह्मणाली, हे महाराज! माझा पति युद्धांत पडला ह्मणून त्याचा हा भुज येथें आला; आतां याच्याबरोबर मी सती जातें. राजानें सांगितलें कीं, तुला जें पाहिजे तें देतों, तूं सहगमन करूं नको. तिनें उत्तर केलें कीं, पतीनें मला स्वर्गास न्यावयाकरितां हा भुज मूळ पाठविला, आतां मी कशी राहूं! तर आपण माझें आईबाप, माझी पाटवणी करावी. तें ऐकून विक्रमानें तिचें साहित्य केलें. मग तिनें त्या भुजेबरोबर अग्नींत प्रवेश केला; इतक्यांत तो स्वार आकाशांतून खालीं उतरला आणि राजास नमस्कार करून ह्मणाला, महाराज! माझें बळ पाहून इंद्रानें मला कुटुंबासहित स्वर्गास बोलाविलें आहे, तर माझी स्त्री मला द्यावी. राजा बोलला कीं, तिनें सहगमन केलें, सर्वांनींही तसेंच सांगीतलें. तें ऐकून तो ह्मणाला मी जिवंत असतां ती सती कोणावरोबर गेली व तुह्मी अशी विपरीत साक्ष कशी देतां! तें ऐकून राजा लज्जेनें खालीं पाहूं लागला, इतक्यांत तोच गारोडी होऊन राजास रामराम करून बोलला, महाराज! मी हा एक चमत्कार करून दाखविला, आतां दुसरा पहावा. नंतर त्यानें त्या स्त्रीस हाक मारतांच ती अग्नींतून बाहेर येऊन

विक्रमापुढें हात जोडून उभी राहिली. तें पाहून सर्व लोक आश्चर्य करूं लागले. मग विक्रमानें त्या गारोड्यास लक्ष रुपये व पांच गांव इनाम दिले. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं आला तेव्हां 'गुणप्रिया' एकतिसावी पुतळी बोलली, राजा ऐक.—

## कथा ३१ वी.

महादेवानें विक्रमराजास कमलाचें फूल दिलें होतें तें सुकलें असें पाहून विक्रमराजास कळलें कीं, आपला मृत्यु सहा महिन्यांनीं होणार; तेव्हां राजानें सर्व राज्य प्रधानाचे स्वाधीन केलें आणि आपण वाईक्षेत्रीं जाऊन राहिला, आणि सर्व राज्यांत दौंडी पिटविली कीं, ज्यास कांहीं मागावयाचें असेल त्यानें वाईंत येऊन मागावें. तें ऐकून नाना देशींचे याचक, भट, पंडित, भिकारी व फकीर वाईस आले; राजा सर्वांस मागितलें तें देऊन संतुष्ट करितो आहे; हें वर्तमान कळून देवही परीक्षा पहावयाकरितां तेथें आले आणि बहुत कठिण मागणीं मागीतलीं; तीहीं विक्रमानें अनेक प्रकारचे कष्ट भोगून त्यांस दिलीं; तेव्हां देव प्रसन्न होऊन बोलले, हे राजा! तुजसारिखा पुरूष या कलियुगांत दुसरा होणार ना-

हीं; मागे सत्ययुगांत जसा सत्यवादी हरिश्चंद्र राजा झाला, त्रेतायुगांत जसा बळी महा दाता झाला व द्वापार युगांत दशरथ राजा जसा महाप्रतापी झाला ते त्यांचे तिन्ही गुण तुझ्यांत आहेत; याकरितां तूं त्यांहून श्रेष्ठ आहेस, असें बोलून देव गेले. एके दिवशीं विक्रमराजा कृष्णेचे तीरीं बसला होता, तेथें एक सुवर्णकांतीचें हरण आलें आणि तें मनुष्यवाणीनें राजास बोललें, राजा! मी पूर्वजन्मीं ब्राह्मण होतों, एके दिवशीं भुकेनें पीडित होऊन फिरत असतां मला एक सिद्ध भेटला, त्याजवळ मी क्षुधेच्या दुःखास्तव मरण मागितलें, तेव्हां त्यानें मला हरण करून सांगितलें कीं, आजपासून तुला भुकेची पीडा होणार नाहीं; पुढें राजा वीर विक्रमादित्य होईल त्याजवळ तूं आपलें हें वर्तमान सांगितलेंस ह्मणजे हरिणजन्मापासून सुटशील आणि तो तुला आपले पुण्यानें स्वर्गास पोहोंचवील; असें बोलून हरिणानें प्राण सोडिला नंतर विक्रमानें त्याचे प्रेताचें दहन करून त्यास स्वर्ग प्राप्त व्हावा याकरितां यज्ञ व दानें बहुत केलीं; तेणेंकरून तो दिव्यशरीरी होऊन स्वर्गलोकास गेला. ही कथा ऐकून भोजराजा माघारा गेला. पुनः दुसरे दिवशीं आला, तेव्हां 'चित्रकला' बत्तिसावी पुतळी बोलली, हे भोजरा-

ला! सर्वांनीं तुला कथा सांगितल्या आतां शेवटील मीही ए-
क कथा सांगत्यें ती ऐक.—

## कथा ३२ वी.

ज्या वेळेस विक्रमाचा अंतसमय आला त्यावेळीं इंद्रानें वि-
क्रमास आणावयाकरितां आपलें विमान पाठविलें; त्यांत ब-
सून विक्रम स्वर्गलोकास गेला. त्यावेळीं अवंतीनगरींत मोठा
अनर्थ झाला. सर्व लोक हा!हा!कार करूं लागले; कारभारी,
भट,भिक्षुक, फकीर, गरीब, दुबळे व सर्व जन ह्मणूं लागले
कीं, आज धर्म बुडाला; परोपकार, दया, दान इत्यादि स-
र्व गुण लयास गेले; राजाच्या स्त्रिया सत्या गेल्या; व दास,
दासी, सेवक, शिपाई, सरदार व मानकरी ह्मणूं लागले कीं,
धिक् आमचे जन्म; आमच्यांत असा कोणी नाहीं कीं जो
राजास माघारा फिरवील; असा राज्यांत मोठा अनर्थ झा-
ला. नंतर प्रधानानें जैत्रपाल राजपुत्रास राजाचा टिक्का क-
रून सर्व राज्यांत त्याचे नांवानें दवंडी फिरविली, आणि
विक्रमाचें क्रियाकर्म करविलें. नंतर जैत्रपाल सिंहासनावर ब-
सूं लागला, तो तत्काळ मूर्च्छना येऊन वरून खालीं पडला;
तेव्हां मंत्री ह्मणाला, महाराज! रात्रीं राजाचें स्मरण करू-

न प्रार्थना करावी आणि भूमीवर निजावें, मग जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें करावें. तें ऐकून रात्रीं जैत्रपाल भूमीवर निजला. त्यास दृष्टांत झाला कीं, तूं उज्जयिनी व धारा नगरी हीं दोन्हीं सोडून अवंतींत रहा आणि हें सिंहासन भूमींत पुरून ठेव. याप्रमाणें स्वप्नांत विक्रमानें सांगितलें. नंतर प्रातःकाळीं उठून प्रधानादिकांस तें सर्व वर्तमान जैत्रपालानें सांगितलें. तेव्हां बेलदारांस बोलावून तें सिंहासन भूमींत पुरून ठेवीलें आणि आपण अवंतींत येऊन राज्य करूं लागला. इतकी कथा सांगून 'चित्रकला' बोलली, हे भोजराजा! आतां आमचें वर्तमान ऐक आह्मी वत्तिसजणी पार्वतीच्या सख्या होतों. एके दिवशीं शिवाचें स्वरूप अत्यंत वृद्ध, रुंडमालांनीं वेष्टित, गजचर्माच्छादित, नागपाशांनीं बद्ध, चिताभस्मानें लिप्त असें पाहून आह्मांस हसूं आलें; तेव्हां महादेवानें आह्मांस शाप दिला कीं, तुह्मी निर्जीव होऊन पृथ्वीवर रहाल, तें ऐकून पार्वतीनें प्रार्थना केली. मग महादेवानें कृपाळू होऊन आह्मांस उःशाप दिला कीं, कलियुगांत राजा विक्रम होईल त्याचें चरित्र भोजराजास सांगाल, तेव्हां तुह्मांस आपलें पूर्वस्वरूप प्राप्त होईल. तो दिवस आज तुझ्या प्रसादानें आला. तुझा आ-

ह्मांवर फार उपकार झाला. राजा! आतां तुला जो वर पाहिजे तो माग. तें ऐकून भोजराजा ह्मणाला जर तुह्मीं प्रसन्न झालां तर ही कथा जो लिहील व वाचील आणि श्रवण करिल त्यास दरीद्र व दुःख हीं कधींही न व्हावीं, हाच वर द्यावा. तें ऐकून 'तथास्तु' ह्मणून बत्तीस पुतळ्या दिव्य स्त्रिया होऊन विमानांत बसून कैलासास गेल्या. नंतर भोजराजानें तें सिंहासन पूर्वठिकाणीं पुरून ठेवून आपलें सर्व राज्य प्रधानाचे स्वाधीन करून आपण तपश्चर्येस जाता झाला.

समाप्त.

हें पुस्तक 'शंकर गणपत चिंचणकर' यांनीं
मुंबईमध्यें
'श्री कल्पतरू' प्रेस मध्यें छापविलें.
सन १८८८.

हीं व दुसरीं पुष्कळ प्रकारचीं पुस्तकें आमचेकडे विकत मिळतील.

पत्ता—माधवबागेची चाळ—मुंबई.